cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–१८२ गुरूवार, दि.२४ ऑक्टोबर २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### काय झाडी, काय डोंगार!

विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया खऱ्या अर्थाने मंगळवारपासून सुरू झाली. अर्ज दाखल करण्याचा दिवस उजाडला तरी महायुती आणि महाविकास आघाडीत जागावाटपाचा तिढा कायम होता. निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी असा सामना रंगणार असल्याने या दोन्ही आघाड्यांमधील पक्षांमध्ये निवडणूक लढवण्यासाठी इच्छुकांची आवक–जावक सुरू आहे. राजकीय समीकरणांमुळे तिकिट मिळण्याची शक्यता दुरावल्याने अनेकांनी बंडाचे निशाण फडकावून दबाव वाढवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले.

## संभाजी ब्रिगेड–ठाकरेंची युती तुटली

पुणे: राज्यातील विधानसभा निवडणुकीबाबत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने संभाजी ब्रिगेडला विश्वासात घेतले नाही, त्यामुळे ही युती आता तुटली असून राज्यात संभाजी ब्रिगेड स्वबळावर लढणार आहे. तसेच राज्यात ५० पेक्षा अधिक उमेदवार देणार असल्याची माहिती संभाजी ब्रिगेडचे प्रदेश प्रवक्ते डॉ.शिवानंद भानुसे यांनी प्रसिद्धी दिली आहे.

## भीमराव धोंडे यांचा अपक्ष अर्ज दाखल



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी–पाटोदा– शिरूर विधानसभा मतदारसंघातुन विधानसभा निवडणुकीसाठी मा. आ. भीमराव धोंडे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. कसलाही गाजावाजा न करता अगदी साध्या पद्धतीने मोजक्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन निवडणूक निर्णय अधिकारी वसिमा शेख व साहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती वैशाली पाटील यांच्याकडे माजी ◀◀ पान २ वर

# ओलाव्यामुळे नाफेडने सोयाबीनची खरेदी थांबविली

## राज्यात परतीच्या पावसाचा फटका; शेतकरी अडचणीत

वर्धा । प्रतिनिधी

**परतीच्या पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले असून यात काढणीला आलेला सोयाबीन पावसाच्या पाण्यात भिजला आहे. त्यामुळे सोयाबीनची मळणी म्हणजेच खळं केल्यावर त्यात ओलावा आढळून येत आहे. यामुळे नाफेडकडून सोयाबीनची खरेदी थांबविण्यात आली आहे. परिणामी शेतकरी अडचणीत सापडला आहे.** ◀◀ पान २ वर



### मराठवाड्यातही दर कोसळले

मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात सुध्दा सध्या ३ हजार ते ४ हजार ३०० रुपये शेतकऱ्यांच्या सोयाबीनला मिळत आहे. यंदा सोयाबीनला सरासरी ५ हजाराचा दर मिळेल, असे वाटत होते. मात्र शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच पडली आहे.

### दरही खाली घसरले

खुल्या बाजारात सोयाबीनचे दर तीन हजार चारशे रूपये पर्यंत खाली घसरले असून शेतकऱ्यांनी सोयाबीनच्या विक्रीसाठी हमी केंद्राकडे मोर्चा वळविला. मात्र तीन दिवसापूर्वी पाऊस बरसल्याने सोयाबीनमध्ये प्रचंड ओलावा निर्माण झाला. त्यामुळे हि खरेदी देखील थांबली आहे. परिणामी खासगी व्यापाऱ्यांकडून कमी दरात खरेदी केली जात आहे.

# उमेदवारांच्या घोषणेनंतर बंडखोरी उफाळली!

## महायुतीचे १८२ उमेदवार जाहीर; ठाकरेंचे ६५ शिलेदार ठरले

मुंबई । प्रतिनिधी

**भाजपच्या पहिल्या यादीमध्ये तब्बल ९९ उमेदवारांच्या नावांची अधिकृत घोषणा तर शिंदेंच्या शिवसेनेकडून ४५ जणांना उमेदवारी जाहीर केली आहे. अजित पवार गटाच्या ३८ जणांना उमेदवारी देण्यात आली आहे. महाविकास आघाडीतील ठाकरे गटाने ६५ जणांना उमेदवारी दिली असून शरद पवार गटाने सुध्दा आपले मावळे जाहीर केले आहेत. उमेदवारांच्या घोषणेनंतर राज्यातील बहुतांश मतदार संघात बंडखोरी होण्याची शक्यता असून महायुती आणि मविआची डोकेदुखी वाढणार असल्याचे चित्र आहे.**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या रविवारी भारतीय जनता पक्षाकडून पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. या पहिल्या यादीमध्ये तब्बल ९९ उमेदवारांच्या नावांची अधिकृत घोषणा करण्यात आली. तर मंगळवारी रात्री उशिरा एकनाथ शिंदे ◀◀ पान २ वर

### दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी तातडीने दिल्ली गाठली

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, खासदार प्रफुल पटेल दिल्लीला रवाना झाले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेणार आहेत. या भेटीत जागावाटपावरच चर्चा होणार आहे. अमित शाह यांनी शिंदे आणि दादांना जागावाटपात तडजोड करण्याचा सल्ला दिला आहे. जागावाटपातील १०६ जागांवर अंतिम तोडगा काढण्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण आहे.

### ठाकरेंची यादी जाहीर, एबी फॉर्मही दिले

नाशिकमध्ये समीर भुजबळांच्या आशा मावळल्या शिवसेना उबाठा पक्षाने ११ उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे. नांदगाव मतदार संघात गणेश धात्रक यांना उमेदवारी दिल्याने समीर भुजबळ यांच्या आता आशा मावळल्या आहेत.

**महायुतीत राज्यातील १८ जागांवरील पेच अद्याप कायम असून तो सोडवण्यासाठी वरिष्ठ पातळीवर प्रयत्न सुरु आहेत. यात अंधेरी पूर्व, चेंबूर, दिंडोशी, कलिना, वरळी, वर्सोवा, शिवडी, धारावी, मिरा भाईंदर, कोल्हापूर उत्तर, गुहागर, करमाळा, बार्शी, कोपरगाव, गंगाखेड, लोहा, बडनेरा आणि बाळापूर या जागांचा समावेश आहे.**

### ठाकरेंचे ६५ शिलेदार

१. सुधाकर बडगुजर(नाशिक पश्चिम)
२. वसंत गिते(नाशिक मध्य)
३. अद्वय हिरे (मालेगाव बाह्य)
४. एकनाथ पवार (लोहा कंधार)
५. के पी पाटील, राधानगरी विधानसभा
६. बाळा माने, रत्नागिरी विधानसभा
७. अनुराधा नागवडे, श्रीगोंदा विधानसभा
८. गणेश धात्रक, नांदगाव
९. उदेश पाटेकर, मागाठाणे विधानसभा
१०. अमर पाटील, सोलापूर दक्षिण
११. दीपक आबा साळुंखे पाटील, सांगोला

सविस्तर यादी पान २ वर

# मविआचा ८५–८५–८५ चा फॉर्म्युला ठरला!

## मित्रपक्षांना झुकते माप, १५ जागांवरील पेच कायम



मुंबई । प्रतिनिधी

**महाविकास आघाडीच्या जागा वाटपाचा फॉर्म्युला अखेर ठरला असून ८५–८५–८५ अशा जागा काँग्रेस, शरद पवार गट आणि ठाकरे गट लढवणार आहे. यात १८ जागा मित्रपक्षांना दिल्या जाणार असून १५ जागांवर अजूनही पेच कायम आहे. ही माहिती मविआच्या नेत्यांनी पत्रकार परिषदेत देण्यात आली.**

महाविकास आघाडीची पत्रकार परिषद खासदार संजय राऊत, बाळासाहेब थोरात, नाना पटोले, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, अनिल देशमुख, अनिल देसाई यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी संजय राऊत यांनी महाविकास आघाडीच्या जागावाटपासंदर्भात प्रश्न विचारले जायचे असे म्हटले. मविआची बैठक शरद पवार यांच्या ◀◀ पान २ वर

### मविआकडून मित्रपक्षांना चांगले स्थान

शरद पवार यांच्यासोबतच्या बैठकीनंतर मविआच्या सर्व पक्षाच्या नेत्यांनी पत्रकार परिषद घेत जागावाटपासंदर्भातील घोषणा केली आहे. मविआ १८ जागा कुणाला देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# धनंजय मुंडे, प्रकाश सोळंकेंना उमेदवारी अजित पवारांकडून ३८ उमेदवार घोषित







मुंबई । प्रतिनिधी

दरम्या, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने ३८ जागांवर उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. राष्ट्रवादीच्या उमेदवार यादीत येवल्यातून छगन भुजबळ आणि कागलमधून हसन मुश्रीफ यांना तिकीट देण्यात आले आहे. त्याचवेळी अजित पवार स्वतः बारामतीतून निवडणूक लढवणार आहेत. याशिवाय कोपुरगावमधून आशुतोष काळे, अकोलेतून किरण लहामटे, बसमतमधून चंद्रकांत उर्फ राजू नवघरे, चिपळूणमधून शेखर निकम आणि मावळमधून सुनील शेळके यांना तिकीट देण्यात आले आहे. तर आंबेगावमधून दिलीप वळसे–पाटील, परळीतून धनंजय मुंडे, दिंडोरीतून नरहरी झिरवळ रिंगणात आहेत. यात इगतपुरीतून हिरामण खोसकर आणि अमरावती शहरातील सुलभा खोडके हे काँग्रेसचे आमदार आहेत, ◀◀ पान २ वर

### माजलगावात बंडखोरीची शक्यता





माजलगाव मतदार संघात आ. प्रकाश सोळंके यांनी राजकीय निवृत्ती घेतली होती, त्यांनी त्यांचे पुतणे जयसिंह सोळंके यांना राजकीय वारसदार म्हणून जाहीर केले होते. त्यामुळे उमेदवारी सुध्दा त्यांनाच मिळेल असे म्हटले जात होते. मात्र ऐनवेळी आ. प्रकाश सोळंके यांना उमेदवारी दिली गेली असल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. आता जयसिंह सोळंके काय भुमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शिवाय ओबीसी नेते माधव निर्मळ आणि बाबरी मुंडे हे सुध्दा बंडखोरीच्या तयारीत असल्याने प्रकाश सोळंके यांची डोकेदुखी वाढणार आहे.

### आष्टीचे आ.बाळासाहेब आजबे वेटींगवर

अजित पवार गटातील चार आमदार वेटींगवर ठेवले असून यात आष्टीचे आ. बाळासाहेब आजबे यांचा समावेश आहे. पहिल्या यादीत त्यांचे नाव नसून माजी मंत्री सुरेश धस हे भाजपकडून इच्छुक आहेत. त्यामुळे आजबे हे वेटींगवर असल्याचे समजते.

### धनंजय मुंडे आज अर्ज दाखल करणार

कृषीमंत्री धनंजय मुंडे यांचे पहिल्याच यादीत नाव आले असून त्यांना एबी फॉर्म देण्यात आला आहे. त्यामुळे ते दि. २४ ऑक्टोबर रोजी परळी मतदार संघातून उमेदवारी अर्ज अगदी साध्या पध्दतीने दाखल करणार आहेत.

## केजमध्ये आ.नमिता मुंदडा यांना धडा शिकवणार

### केजच्या बैठकीत रिपाइं कार्यकर्त्यांचा एल्गार

केज । प्रतिनिधी

महायुतीने केजच्या जागे संदर्भात पुनर्विचार करून जागा रिपाइंचे नेते युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांना उमेदवारी देण्यात यावी. या मागणीसाठी रिपाइं कार्यकर्ते आक्रमक झाले असून जर पप्पू कागदे ◀◀ पान २ वर



## बदामराव पंडीतांना गेवराईतून मशालीची उमेदवारी

### » तुतारी हाती घेण्याची धडपड करणाऱ्यांच्या हाती भोपळा

बीड । प्रतिनिधी

शिवसेना उबाठा पक्षाने ६५ जणांना पहिल्या यादीत उमेदवारी जाहीर केली असून गेवराई मतदार संघातून बदामराव पंडीत यांचा समावेश आहे. त्यामुळे तुतारी हाती घेण्यासाठी धडपड करणाऱ्या अनेकांच्या हाती



भोपळा आला आहे. ◀◀ पान २ वर

### आ. लक्ष्मण पवारांची मोठी कोंडी



आ. पवार यांनी पक्ष नेतृत्व आणि मित्र पक्षाचे मंत्री यांच्यावर जोरदार टिका केली होती. त्यामुळे त्यांचा प्रवास तुतारीकडे असल्याचे म्हटले जात होते. आता गेवराईची जागा ठाकरे गटाला सुटल्याने आ. पवार यांची मोठी कोंडी झाली आहे. भाजपकडून उमेदवारी घेण्यातच आता त्यांना अडथळा येऊ शकतो. जरी उमेदवारी मिळाली तरी मुंडे बहिण–भावांवर केलेली टिका त्यांना आता भोवणार असल्याचे म्हटले जात आहे.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड,दि.२२ ऑक्टोबर २०२४
आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४.५० क्विंटल | २,६८० | २,९३१ | २,७९५ |
| ज्वारी/हायब्रिड :७३.५० क्विंटल | १,६७५ | २,९५१ | २,२८९ |
| मका/लोकल :३०.०० क्विंटल | २,४८१ | २,४८१ | २,४८१ |
| तूर :७.५० क्विंटल | ८,६०० | ८,६०० | ८,६०० |
| उडीद : ९०.५० क्विंटल | ५,३५० | ७,४८० | ६,६७५ |
| बाजरी: २.०० क्विंटल | २,४४० | २,७०० | २,५९६ |
| मुग : १.५० क्विंटल | ६,५०० | ७,१०० | ६,८०० |
| सोयाबीन: २११.०० क्विंटल | २,९०० | ४,२०० | ३,८९५ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ६,००१ | ७,००० | ६,५०० |

# भारतातील सर्वात मोठा प्रकल्प महाराष्ट्रात

## अंबानी करणार १०००० कोटींची गुंतवणूक; हजारो हातांना मिळणार रोजगार

मुंबई । प्रतिनिधी

देशातील सर्वात मोठा प्रकल्प महाराष्ट्रात बनत आहे. महाराष्ट्रातील हा प्रकल्प पाकिस्तानसाठी धडकी भरवणारा आहे. कोकणात सुरु होणाऱ्या या प्रकल्पात अनिल अंबानी यांनी तब्बल १०००० कोटींची गुंतवणूक केली आहे. रिलायन्स डिफेन्स लिमिटेड रत्नागिरीमध्ये स्फोटके, दारुगोळा आणि लहान शस्त्रे तयार करणारा प्लांट उभारणार आहे. संरक्षण क्षेत्रातील हा सर्वात मोठा नवीन प्रकल्प मानला जात आहे. महाराष्ट्रातील हा सर्वात मोठा प्रकल्प पाकिस्तानसाठीही धडकी भरवणारा आहे. या प्रकल्पामुळे हजारो हातांना काम मिळणार आहील रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरने महाराष्ट्रातील या मोठा डिफेन्स प्रोजेक्टची घोषणा केली आहे.





रिलायन्स डिफेन्स लिमिटेड ही रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरसबसिडरी कंपनी आहे. रिलायन्स डिफेन्स लिमिटेड कंपनी कोकणात धीरुभाई अंबानी डिफेन्स सिटी उभारणार आहे. या प्रक्लपासाठी रत्नागिरीतील वाटड औद्योगिक परिसरात १००० एकर जमीन देण्यात आली आहे. येथेच धीरुभाई ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# काय झाडी, काय डोंगार!

विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया खऱ्या अर्थाने मंगळवारपासून सुरू झाली. अर्ज दाखल करण्याचा दिवस उजाडला तरी महायुती आणि महाविकास आघाडीत जागावाटपाचा तिढा कायम होता. निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी असा सामना रंगणार असल्याने या दोन्ही आघाड्यांमधील पक्षांमध्ये निवडणूक लढवण्यासाठी इच्छुकांची आवक-जावक सुरू आहे. राजकीय समीकरणांमुळे तिकिट मिळण्याची शक्यता दुरावल्याने अनेकांनी बंडाचे निशाण फडकावून दबाव वाढवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले.

काही कारणाने अडगळीत पडलेले नेते मरगळ झटकून पक्षबदल करत तिकिट मिळवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करताना दिसले. त्यामुळे सध्या विविध पक्षांमध्ये पक्षप्रवेशाच्या सोहळ्यांची लाट आली आहे. भाजपकडून ऐरोली विधानसभेची उमेदवारी मिळालेले मुंबईतील बडे प्रस्थ गणेश नाईक यांचे पुत्र संदीप नाईक यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश केला. पंतप्रधान मोदी काँग्रेसमधील कोणत्या 'घराणेशाही'ची बात करत आहेत? घराणेशाही अशा प्रकारेही चालवता येऊ शकते! वडील भाजपकडून तर पुत्र राष्ट्रवादीकडून निवडणूक लढवणार, आता बोला! माजी मंत्री राजकुमार बडोले अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामील झाले. भाजपचे खासदार नारायण राणे यांचे पुत्र नितेश राणे कणकवलीतून लढणार आहेत. तर दुसरे सुपुत्र निलेश राणे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत दाखल होत आहेत.

म्हणजे वडील खासदार आणि दोन्ही पुत्र आमदार जय हो घराणेशाही! ही घराणेशाही भाजपातून होत असल्याने देशाला मोठा धोका होणार नाही ही बाब वेगळी! काही महिन्यांपूर्वी राजकीय संन्यास घेण्याची घोषणा केल्यानंतर माजी खासदार निलेश राणे पुन्हा एकदा राजकारणात सक्रिय झाले आहेत. वडील आणि भाऊ भाजपचे लोकप्रतिनिधी असताना त्यांनी थेट भाजपला रामराम ठोकत शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. तब्बल १९ वर्षांनी निलेश राणे शिवसेनेत परतत आहेत. शिवसेनेतून राजकीय कारकीर्द सुरू करणाऱ्या निलेश राणेचे हे चौथे पक्षांतर म्हणावे लागेल. शिनसेना सोडल्यानंतर त्यांनी वडिलांसोबत काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. तिथे खासदारकीही मिळवली होती. त्यानंतर त्यांनी नारायण राणेंनी काढलेल्या महाराष्ट्र स्वाभिमान पक्षात प्रवेश केला होता. नंतर राणेंनी हा पक्ष भाजपमध्ये विलीन केला. त्यामुळे निलेश राणे पर्यायाने भाजपमध्ये दाखल झाले. आता ते पुन्हा शिवसेनेत प्रवेश करत आहेत. छगन भुजबळ यांचे पुतणे समीर भुजबळ हे नांदगाव विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असल्यामुळे ते बंडखोरीच्या पवित्र्यात आहेत.

महाविकास आघाडीत जाण्यासाठी ते उत्सुक असल्याने राष्ट्रवादीचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार त्यांच्यावर नाराज आहेत. त्यामुळेच त्यांच्याकडून राष्ट्रवादी काँग्रेस मुंबई अध्यक्षपदाचा राजीनामा घ्या, अशी सूचना अजित पवार यांनी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना दिली आहे. भाजपची यादी जाहीर झाल्यानंतर पक्षातील नाराज नेत्यांनी बंडाचे निशाण फडकावले आहे. उमेदवारी न मिळालेले अथवा मिळण्याची शक्यता नसलेले इच्छुक तिकिटासाठी पक्षश्रेष्ठींची मनधरणी करण्यात गुंतले आहेत. पहिल्या यादीत स्थान न मिळालेले विद्यमान आमदार, नाराज नेते आणि उमेदवारीसाठी इच्छुक नेते यांची देवेंद्र फडणवीस यांच्या 'सागर' निवासस्थानी गर्दी उसळली होती. यंदाच्या निवडणुकीत बहुतांश मतदारसंघांत बंडाचे वारे वाहू लागल्याचे दिसून येत आहे. 'पक्षनिष्ठा' हा विषयच या निवडणुकीतून गायब होतो की काय अशी स्थिती आहे. सत्तेची नशा इतकी चढली आहे की, मुलगा-बाप, भाऊ-बहीण, पती-पत्नी, गुरू-शिष्य ही नातीच गायब होतात की काय अशी भीती वाटते. मतदारांना तर गृहितच धरण्यात आले आहे. निवडणुकीच्या काळात सर्व तपास यंत्रणांना सजग राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पैशाच्या देवाणघेवाणीवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. या संदर्भात काही मतदारसंघ अत्यंत संवेदनशील आहेत. अशा मतदारसंघांत होणारी पैशाची देवाणघेवाण, व्यवहार अथवा अन्य कोणत्याही संशयास्पद वित्तीय बाबींवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. राज्यात विधानसभेची निवडणूक जाहीर होताच नोटांचा सुळसुळाट सुरू झाला आहे. मंगळवारी रात्री पुणे जिल्ह्यातील खेड-शिवापूर टोलनाक्यावर पोलिसांनी एका इनोव्हा गाडीत ५ कोटींची रोकड पकडली. ही गाडी सांगोल्याचे शिंदे गटाचे आमदार शहाजी बापू पाटील यांच्या मुलाची असल्याची चर्चा आहे. त्यावरून ठाकरे गटाने थेट मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. मुख्यमंत्री शिंदे हे प्रत्येक उमेदवाराला ५० कोटींची रसद पुरवत आहेत. त्याचा पहिला हप्ता म्हणून १५ कोटींचे वाटप झाले आहे. १५ कोटींची रोकड असलेल्या दोन गाड्या पकडण्यात आल्या होत्या. पैकी एक गाडी मुख्यमंत्र्यांच्या सांगण्यावरून सोडण्यात आली असे उबाठा गटाचे संजय राऊत म्हणाले तर रोहित पवार यांनी गाडीतील रोकडीच्या थप्प्यांचा व्हीडीओच ट्विट केला.

महाराष्ट्रात निवडणूक जाहीर झाल्यापासून मोठी रक्कम पकडली जाण्याचे हे पहिलेच प्रकरण आहे. आगामी काळात अशा अनेक गाड्या पकडल्या जातील. त्यातील रकमेवर कुणीच दावा करणार नाही आणि ही रक्कम नेमकी कुणाची आहे हे कधीच उघड होणार नाही! आचारसंहिता लागू झाली त्याच दिवशी राज्यातील बहुतेक मतदारसंघांत पहिला हप्ता पोहोचला होता. खेड-शिवापूर टोलनाक्यावर दोन गाड्या पकडण्यात आल्या, पैकी एक गाडी मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरून फोन आल्याने सोडून देण्यात आली, त्या गाडीत दहा कोटी रुपये होते. ते दहा कोटी 'काय झाडी, काय डोंगार'कडे व्यवस्थित पोहोचले. उबाठा गटाचे कार्यकर्ते जमल्याने ५ कोटी पकडल्याचे दाखवावे लागले असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. निवडणूक आयोग केवळ कारवाई केल्याचे नाटक करील असेही ते म्हणाले. रोकड जप्त प्रकरणी ज्यांचे नाव घेतले जात आहे ते शिंदे गटाचे शहाजी बापू पाटील यांनी आपल्यावरील आरोप फेटाळले आहेत. जप्त रकमेशी माझा काडीमात्र संबंध नाही. ज्याची गाडी पकडण्यात आली, ती गाडी अमोल नलावडे यांची असून ते शेकापचे कार्यकर्ते आहेत. त्यांचे अनेक उद्योग आहेत. नलावडे हे रस्ता बांधकाम व्यावसायिक आहेत, त्यांनी हे पैसे आपले असल्याचा दावा केला आहे. या पैशाचे काही राजकीय लागेबांधे आहेत काय याचा तपास सुरू आहे. आरटीओच्या नोंदीनुसार ही गाडी अमोल नलावडे यांच्या मालकीची आहे, मात्र ती त्यांनी बाळासाहेब आजबे यांना विकली आहे म्हणे. आता निवडणूक काळात अशा अनेक सुरस कथा ऐकावयास मिळतील.

# स्वत:च्या स्त्री अर्भकास ठार मारणाऱ्या आईला जन्मठेपेची शिक्षा

**जालना । प्रतिनिधी**

स्वतःच्या नवजात स्त्री अर्भकास ठार मारणार्या मातेस जन्मठेपची शिक्षा जिल्हा व सत्र न्यायाधीश १जालना यांनी २३ ऑक्टोंबर रोजी शिक्षा ठोठावली. आरोपी महिला संगिता राजु राठोड, वय ३६ वर्ष रा. शेवगळ तांडा ता. घनसावंगी जि. जालना असे तिचे नांव आहे. तिने स्वतः नवजात बालकास नाळेने गळा आवळुन खुन केल्या प्रकरणी कलम ३०२ भा.द.वी. मध्ये जन्मठेपेची शिक्षा व पाच हजार रूपये दंड व कलम २०१ भादवी मध्ये ३ वर्ष सश्रम करावास व तीन हजार रूपये दंड व कलम ३१८ भादवी मध्ये २ वर्षे सश्रम कारावास व दोन हजार रूपये दंड अशी शिक्षा ठोठावली. घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, दिनांक ६ मे २०२३ रोजी सकाळी ०९.३० वाजेच्या पुर्वी आरोप संगीता व तीची आई यांनी संगणमत करून आरोपी कं. ०१ हीस जन्मलेले नुकतेच जन्मलेले स्त्री जातीच्या अर्भकाचा गुप्त पणे विल्हेवाट लावण्याचा उद्देशाने त्या अर्भकाचा नाळेने गळा आवळुन खुन करून नालीत फेकुन पुरावा नष्ट केला. या प्रकरणी फिर्यादी पत्रकार सुरज मानकर यांच्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन परतुर येथे गुन्हा कं. १७४/२०२३ कलम ३०२,२०१,३१८,३४ भादंवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. तपासाअंती मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

आरोपी संगीता (मुळ राहणार शेवगळ तांडा, तालूका घनसावंगी हीचे पती घटनेच्या १५ वर्ष पूर्वी मयत झालेले आहे. घटनेच्या काही दिवस आधी ती तीची आई आरोपी क. २ यशोदा हीच्याकडे मौजे मोसा, ता. मंठा जि. जालना येथे राहत होती. अनैतिक संबंधातुन जन्मला आलेल्या स्त्री जातीच्या बाळाची हत्या करून पुरावा नष्ट करण्यासाठी ते बाळ नालीत टाकुन दिले. या कामी तीला तिचे आई आरोपी कं. यशोदा हिने मदत केली असे तपासअंती निष्पन्न झाले. सरकार पक्षातर्फे सदर प्रकरणात अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड सोळंके यांनी एकूण १४ साक्षीदार तपासले. त्यापैकी पाच वैदयकीय अधिकारी व पोलीस उपनिरीक्षक यांच्या साक्षी साक्षी महत्वाच्या ठरल्या. मा. न्यायालयापुढे सरकारपक्षातर्फे आलेला साक्षीपुरावा व दोन्ही बाजुचा युक्तीवाद लक्षात घेवून मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश-०१, जालना यांनी आरोपी संगिता राजु राठोड, वय ३६ वर्ष रा.शेवगळ तांडा ता. घनसावंगी जि. जालना या आरोपीस स्वतः नवजात बालकास नाळेने गळा आवळुन खुन केल्या प्रकरणी कलम ३०२ भा.द.वी. मध्ये जन्मठेपेची शिक्षा व पाच हजार रूपये दंड व कलम २०१ भादवी मध्ये ३ वर्ष सश्रम करावास व तीन हजार रूपये दंड व कलम ३१८ भादवी मध्ये २ वर्षे सश्रम कारावास व दोन हजार रूपये दंड अशी शिक्षा ठोठावली.

# जालन्यात महायुतीमध्ये बिघाड

## भाजपाचे दानवे, राजेश राऊत बंडखोरीच्या तयारीत

**जालना । प्रतिनिधी**

**राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये अनेक ठिकाणी बंडखोरी पाहायला मिळत आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यामुळे अनेक इच्छुक बंडखोरीच्या पवित्र्यात आहेत. विशेष म्हणजे, भाजपमध्येही अनेक ठिकाणी बंडखोरी पाहायला मिळत आहे. जालना विधानसभा मतदारसंघात शिंदे गटाचे उमेदवार अर्जुन खोतकर यांच्याविरोधात भाजप बंडखोरी करण्याच्या तयारीत आहे.**

लोकसभा निवडणुकीत जालना मतदारसंघात भाजपला मोठा धक्का बसला होता. पक्षाचे दिग्गज नेते रावसाहेब दानवे यांचा काँग्रेसच्या कल्याण काळेंकडून पराभव झाला. स्थानिक शिवसेना नेत्यांनी भाजपचे काम न केल्यामुळे सलग पाचवेळा निवडून येणार्या दानवेंचा पराभव झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळेच आता विधानसभा निवडणुकीत भाजपकडून शिंदे सेनेच्या अर्जुन खोतकरांविरोधात बंडखोरी केली जात आहे. दानवे बंडखोरीच्या तयारीत माजी मंत्री अर्जुन खोतकर यांना शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारी घोषित झाली. त्यानंतर आता रावसाहेब दानवे यांचे चुलत भाऊ भास्कर दानवे बंडखोरी करण्याची शक्यता आहे. जालना विधानसभा मतदार संघात आपण



रावसाहेब दानवेंच्या माध्यमातून दहा वर्षांपासून भाजपा पक्ष वाढीचे आणि विकासाची कामे केल्याचा दावा भास्कर दानवे यांनी केला आहे. आपण भाजपा कार्यकर्त्यांशी चर्चा करून दोन दिवसात निर्णय घेणार असल्याचे सांगितले. विशेष म्हणजे, भास्कर दानवे यांच्यासह भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य राजेश राऊत हेदेखील जालना विधानसभा लढवणार असल्याची माहिती आहे. राजेश राऊत हे भाजपचे माजी नगराध्यक्ष असून, जालना शहरासह विधानसभा मतदार संघात त्यांची चांगली पकड आहे. म्हणजेच, आता अर्जुन खोतकर यांच्याविरोधात भाजपचे दोघे बंडखोरी करण्याची तयारीत आहेत. त्यामुळेच अर्जुन खोतकर यांना यंदाची निवडणूक जड जाण्याची शक्यता नाकारता येत आहे. आता भाजप आपल्या बंडखोरांची समजून काढणार का? हे पाहणे महत्वाचे आहे. व तसेच आता कोण कोणाला पाडणार याकडे सर्वांचे लक्ष लागलो आहे. या बंडखोरीमुळे अर्जुनराव खोतकर यांची डोकेदुखी वाढली आहे असे म्हणाला हरकत नाही.

# विधानसभा निवडणुकीतही सामान्य जनता काँग्रेसच्या पाठीशी उभी राहिल-डॉ.पी.सी.शर्मा

**जालना । प्रतिनिधी**

**राज्यातील अनेक मोठे उद्योग गुजरात मध्ये पळविण्यात भाजपा महायुती सरकारने महत्वाची भूमिका बजावली आहे. जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडल्याने सर्वसामान्य जनतेला जीवन जगणे मुश्कील झाले असून ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता लोकसभे प्रमाणेच विधानसभा निवडणुकीत देखील सर्वसामान्य जनता महाविकास आघाडीच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहिल असा विश्वास अ.भा.कॉ. कमिटीचे सचिव तथा जालना लोकसभा प्रभारी डॉ.पी.सी. शर्मा यांनी आज येथे एका पत्रकार परिषदेत बोलतांना व्यक्त केला.**

शहरातील एका हॉटेल मध्ये आज बुधवारी दुपारी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी खा. डॉ. कल्याण काळे, आ.कैलास गोरंटयाल, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, कार्याध्यक्ष राजेंद्र राख, शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमुद, जिल्हा उपाध्यक्ष विजय चौधरी यांची उपस्थिती होती. यावेळी पत्रकारांशी बोलतांना शर्मा म्हणाले की, मध्यप्रदेश राज्यात कमलनाथ यांच्या नेतृत्वातील काँग्रेस सरकार पाडण्यासाठी वापरलेला फार्मुला भाजपाने महाराष्ट्रातही वापरला. शिवसेनेच्या आमदारांना पैसे आणि इतर आमिष दाखवून भाजपाने राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार पाडले आणि सत्ता काबीज केली. ही वस्तुस्थिती राज्यातील सर्व जनतेने त्यांच्या डोळ्यांनी बघितली होती. एव्हढेच नाही तर राज्यात सत्तेत आल्यानंतर भाजपा आणि महायुती सरकारच्या कारकीर्दीत महाराष्ट्रातील अनेक मोठे उद्योग गुजरात राज्यात पळवून नेले. सदर उद्योग गुजरात मध्ये पळविण्यात राज्यात सत्तेत असलेल्या महायुती सरकारचाच हात असल्याचा आरोप डॉ.शर्मा यांनी यावेळी केला. उध्दव ठाकरे आणि शरद पवार यांचे पक्ष चिन्हासह पळविण्यात आले. मात्र, नवीन चिन्ह असतांनाही कोणत्याही भूलथापांना बळी न पडता ठाकरे आणि पवार यांना महाराष्ट्रातील जागरूक जनतेने खंबीर साथ देत लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या पारड्यात भरभरून मतदान टाकले आणि भाजपा महायुतीला त्यांची जागा दाखवून दिली. या महायुती सरकारच्या अडीच वर्षाच्या काळात जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडले असून गुन्हेगारी, भ्रष्टाचाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेऊन



आगामी विधानसभा निवडणुकीत देखील लोकसभे प्रमाणेच महाविकास आघाडीला यश मिळेल असा विश्वास डॉ. शर्मा यांनी यावेळी व्यक्त केला. दरम्यान, तत्पूर्वी डॉ. पी.सी.शर्मा यांच्या हस्ते महायुती सरकारच्या भ्रष्ट कारकीर्दीचा पर्दाफाश करणाऱ्या '' गद्दारांचा पंचनामा '' या पत्रकाचे विमोचन करण्यात आले. यावेळी राम सावंत, महावीर ढक्का, अतिकखान, राजेंद्र गोरे, विनोद यादव, अशोक उबाळे, शिवप्रकाश चितळकर, अण्णासाहेब खंदारे, राजेश पवार आदींची उपस्थिती होती.

**घोटाळेबाज सरकारने अदानी, अंबानी यांची घर भरली - खा.काळे**

राज्य आणि केंद्रातील सरकारने कोटयावधी रुपयांचे घोटाळे करत अदानी, अंबानी या उद्योगपतींची घर भरली असल्याचा आरोप खा. डॉ. कल्याण काळे यांनी यावेळी केला. मागील दहा वर्षात शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. शेतमालाला योग्य भाव मिळत नाही, वीज नाही, घेतलेले कर्ज फेडण्यास येत असलेल्या अपयशामुळे राज्यात विशेषतः मराठवाडा विभागात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. अर्थखात्याचा कोणताही अभिप्राय नसतांना राज्य सरकारने आचारसंहिता लागू होण्यापूर्वी जवळपास दिडशे पेक्षा अधिक शासन निर्णय काढले असा आरोप देखील खा. डॉ. कल्याण काळे यांनी यावेळी बोलतांना केला.

**लाभ घेणाऱ्या लाडक्या बहिणींची साथ मविआलाच मिळणार - आ. गोरंटयाल**

राज्य सरकारने सुरू केलेल्या लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळालेल्या बहिणींची साथ महाविकास आघाडीलाच मिळणार असल्याचा दावा आ. कैलास गोरंटयाल यांनी यावेळी केला. लोकसभा निवडणुकीत मोठया प्रमाणावर फटका बसल्याने राज्यातील महायुती सरकारने सत्तेत पुन्हा येण्यासाठी लाडकी बहीण योजना आणली. त्याचा लाभ मिळत असला तरी तेल, साखर आदी जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढवून लाडक्या बहिणींची झोप उडवून टाकली आहे. त्यामुळे सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या बहिणींची साथ आम्हालाच मिळणार असल्याचा दावा गोरंटयाल यांनी केला. जालना शहरातील पाणी प्रश्न सोडविण्यात बऱ्यापैकी यश आले आहे. हातवन प्रकल्पातून शहराला पाणी पुरवठा करण्याचा प्रयत्न असून घानेवाडी ते जालना या जलवाहिनीची गळती थांबवण्यासाठी दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. शिवाय जायकवाडी योजनेद्वारे अधिक प्रमाणात पाणी पुरवठा व्हावा यासाठी अंबड येथील जलशुद्धीकरण केंद्रातील कामाला देखील सुरू करण्यात आले आहे त्यामुळे येत्या काळात शहराला चार दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न केला जाईल अशी ग्वाही आ. कैलास गोरंटयाल यांनी यावेळी दिली.

**मोदी - शहांच्या दबावामुळे उद्योग गुजरात मध्ये पळवले - देशमुख**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्या दबावतंत्रामुळेच महाराष्ट्रातील अनेक उद्योग गुजरात राज्यात पळवून नेल्याचा आरोप काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी केला. सदर उद्योग पळवल्याने राज्यातील लाखो तरुण रोजगारापासून वंचित राहिले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या कामात भ्रष्टाचार, महापुरुषांचा अवमान, लेकी बाळींवर होत असलेले अत्याचार शेतमालाला हमी भाव आणि पीक विमा मिळत नसल्याने शेतकऱ्यांची अवस्था खुप वाईट झाली असून पेट्रोल, डिझेलसह तेल, तिखट, मीठ आदी जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढवून सामान्य जनतेचे कंबरडे मोडण्याचे काम केंद्र आणि राज्य सरकारच्या काळात झाले असून यामुळे त्रस्त झालेली जनता महाविकास आघाडीच्या पाठीशी उभी राहिल असा विश्वास देशमुख यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केला.

## पान १ वरून...

### भीमराव धोंडे यांचा

आमदार भीमराव धोंडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. याप्रसंगी युवा नेते अजयदादा धोंडे,माजी सभापती ॲड. साहेबराव म्हस्के, अभयराजे धोंडे,उपसभापती पांडुरंग नागरगोजे, दिलीपराव काळे, माजी शिक्षण सभापती नियामत बेग, जेष्ठ नेते विठ्ठलराव बनसोडे, माजी जि. प. सदस्य अशोक सवासे,माजी सभापती सौ. सुवर्णाताई लांबरुड, जेष्ठ नेते लालाभाऊ कुमकर, ॲड. अशरफ शेख, बाबुराव कदम,पाडुरंग गावडे, चेअरमन राजेश धोंडे, माजी जि. प. सदस्य रामराव खेडकर,माजी सरपंच बाळासाहेब पवार,ॲड. रत्नदिप निकाळजे,रिपाइंचे अध्यक्ष अशोक साळवे,बाबा ससाणे, संजय धायगुडे,चंद्रशेखर साके, सरपंच दादासाहेब जगताप, रघुनाथ शिंदे आदि मान्यवर उपस्थित होते.

-------------

### ओलाव्यामुळे नाफेडने

खरीप हंगामात लागवड करण्यात आलेल्या सोयाबीन काढणीला आला असताना परतीच्या पावसाचे जोरदार आगमन झाले. यामुळे काढणीवर असलेला सोयाबीन पूर्णपणे पावसात भिजला. दरम्यान १५ ऑक्टोंबरपासून शासकीय खरेदी केंद्र असलेल्या नाफेडने खरेदी केंद्र सुरु केले होते. मात्र शेतकरी आणत असलेला सोयाबीनचा माल ओला असल्याने नाफेडकडून असा माल खरेदी केला जात नाही. शासकीय हमी केंद्रात सोयाबीनची खरेदी थांबविण्यात आल्याने दिवाळीच्या तोंडावर सोयाबीन उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहेत.

-----------

### उमेदवारांच्या घोषणेनंतर

यांच्या शिवसेनेच्या ४५ उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. दरम्यान, अजित पवार गटाकडून काही उमेदवारांना एबी फॉर्म दिल्यानंतर अजित पवार गट राष्ट्रवादीकडून ३८ उमेदवारांची पहिली यादी अधिकृतरित्या बुधवारी जाहीर करण्यात आली. असे असताना मात्र महायुतीमध्ये अद्याप १८ जागांवर पेच कायम असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान ठाकरे गटाने सुध्दा ६५ जणांना उमेदवारी जाहीर केली असून महाविकास आघाडीत उमेदवारी जाहीर करण्यात बाजी मारली आहे. ठाकरेंच्या पहिल्या यादीत दिग्गजांचा समावेश आहे. उमेदवारांच्या नावांची घोषणा झाल्यावर बहुतांश मतदार संघात बंडखोरी होण्याची शक्यता असून याचा त्रास महायुती आणि महाविकास आघाडीला सुध्दा होणार आहे. बंड शमवण्यासाठी काही जागा जाहीर करण्यास सावध पवित्रा घेतला जात आहे. तर काही ठिकाणी महाविकास आघाडीचा उमेदवार ठरल्यानंतर महायुतीतील आपला उमेदवार देणार आहे.

**ठाकरेंचे ६५ शिलेदार**

चाळीसगाव-उन्मेश पाटील, पाचोरा- वैशाली सुर्यवंशी, मेहकर (अजा) - सिध्दार्थ खरात, बाळापूर -नितीन देशमुख, अकोला पूर्व- गोपाळ दातकर, वाशिम (अजा) -डॉ. सिध्दार्थ देवळे, बडनेरा- सुनील खराटे, रामटेक राक्षस बरबट, वणी -संजय देरकर, लोखंड- एकनाथ पवार, कळमनुरी -डॉ. संतोष टारफे, परभणी -डॉ. राहुल पाटील, गंगाखेड- विशाल पाऊल, सिल्लोड- सुरेश म्हणून, कन्नड -उदयसिंग राजपूत, संभाजीनगर मध्य -किशनचंद तनवाणी, संभाजीनगर प. (अजा) -राजु शिंदे, वैजापूर दिनेश परदेशी, नांदगाव गणेश धात्रक, मालेगाव विस्तार. अद्वय हिरे, निफाड अनिल कदम, नाशिक मध्य वसंत गीते, नाशिक पश्चिम, पालघर (अज) सुधाकर बडगुजर जयेंद्र दुबळा, बोईसर (अज) डॉ. विश्वास वळवी, चाळीसगाव उन्मेश पाटीली, पाचोरा वैशाली सुर्यवंशी, मेहकर (अजा) सिध्दार्थ खरात, बाळापूर नितीन देशमुख, अकोला पूर्व गोपाळ दातकर, वाशिम (अजा) डॉ. सिध्दार्थ देवळे, बडनेरा सुनील खराटे, रामटेक राक्षस बरबट, वणी संजय देरकर, लोखंड एकनाथ पवार, कळमनुरी डॉ. संतोष टारफे, परभणी डॉ. राहुल पाटील, गंगाखेड, सिल्लोड, कन्नड विशाल पाऊल सुरेश म्हणून उदयसिंग राजपूत, संभाजीनगर म किशनचंद तनवाणी, संभाजीनगर प. (अजा) राजु शिंदे, वैजापूर दिनेश परदेशी, नांदगाव गणेश धात्रक, मालेगाव विस्तार. अद्वय हिरे, निफाड अनिल कदम, नाशिक मध्य वसंत गीते, नाशिक पश्चिम, पालघर (अज) सुधाकर बडगुजर जयेंद्र दुबळा, बोईसर (अज) डॉ. विश्वास वळवी, भिवंडी ग्रामीण (अज) महादेव घाटाळ, अंबरनाथ (अजा) राजेश वानखेडे, डोंबिवली दिपेश म्हात्रे, कल्याण ग्रामिण सुभाष भोईर, ओवळा माजिवडा नरेश मणेरा, कोपरी पाचपाखाडी केदार दिघे, ठाणे राजन विचारे, ऐरोली एम. के. मढवी, मागाठाणे उदेश पाटेकर, विक्रोळी सुनील राऊत, भांडुप पश्चिम रमेश कोरगावकर, जोगेश्वरी पूर्व अनंत (बाळा) नर , दिंडोशी सुनील प्रभू, गोरेगाव समीर देसाई, अंधेरी पूर्व ऋतुजा लटके, चेंबूर प्रकाश फातर्पेकर, कुर्ला () प्रविणा मोरजकर, कलिना संजय पोतनीस, वांद्रे पूर्व वरुण सरदेसाई, माहिम महेश सावंत, वरळी आदित्य ठाकरे, कर्जत नितीन सावंत, उरण मनोहर भोईर, महाड स्नेहल जगताप, नेवासा शंकरराव गडाख, गेवराई बदामराव पंडीत, धाराशिव कैलास पाटील, परांडा राहुल ज्ञानेश्वर पाटील, बार्शी दिलीप सोपल, सोलापूर दक्षिण अमर रतिकांत पाटील, सांगोले दिपक आबा साळुंखे , पाटण हर्षद कदम, दापोली संजय कदम, गुहागर भास्कर जाधव, रत्नागिरी सुरेंद्रनाथ (बाळ) माने, राजापूर राजन साळवी, कुडाळ वैभव नाईक, सावंतवाडी राजन तेली, राधानगरी के.पी. पाटील, शाहूवाडी सत्यजीत आबा पाटील

---------------

### धनंजय मुंडे, प्रकाश सोळंकेंना उमेदवारी

ज्यांना अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी देण्यात आली आहे. या दोन आमदारांवर काँग्रेसने यापूर्वीच निलंबनाची कारवाई केली आहे. मात्र, विधानसभेत ही प्रक्रिया अद्याप प्रलंबित आहे. खोसकर यांनी १५ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. त्याचवेळी आठवडाभरापूर्वी सुलभा खोडके यांनी विधान परिषदेच्या निवडणुकीत क्रॉस व्होट केल्यामुळे काँग्रेसने त्यांची पक्षातून हकालपट्टी केली होती. अहेरी विधानसभा मतदारसंघातून धर्मरावबाबा आत्राम, श्रीवर्धनमधून आदिती तटकरे, अंमळनेरमधून अनिल भाईदास पाटील, उदगीरमधून संजय बनसोडे, अर्जुनी मोरगावमधून राजकुमार बडोले, माजलगामधून प्रकाशदादा सोळंके, वाईतून मार्कंड पाटील, सिन्नरमधून माणिकराव कोकाटे, खेडमधून दिलीप कोकाटे आणि खेडमधून दिलीप. राष्ट्रवादीने अहमदनगरमधून मोहिते, संग्राम जगताप, इंदापूरमधून दत्तात्रय भरणे, अहमदपूरमधून बाबासाहेब पाटील, शहापूरमधून दौलत दरोडा, पिंपरीतून अण्णा बनसोडे आणि कळवणमधून नितीन पवार यांना उमेदवारी दिली आहे. जुन्नरमधून अतुल बेनके, मोहोळमधून यशवंत विठ्ठल माने, हडपसरमधून चेतन तुपे, देवळालीतून सरोज अहिरे, चंदगडमधून राजेश पाटील, इगतपुरीतून हिरामण खोसकर, तुमसरमधून राजू कारेमोरे, पुसदमधून इंद्रनील नाईक, अमरावती शहरातून सुलभा खोडके, ना. भरत गावित, पाथरीतून निर्मला उत्तमराव विटेकर आणि मुंब्रा कळव्यातून नजीब मुल्ला यांना तिकीट देण्यात आले आहे.

----------

### मविआचा ८५-८५-८५

सोबत पार पडली. शरद पवार यांनी महाविकास आघाडीचे जागावाटप जाहीर करण्याचे आदेश दिले. मविआचे जागावाटप सुरळीतपणे पार पडले आहे, असे राऊत यांनी सांगितले. समाजवादी पार्टी, शेकाप यांना सामावून घेणार जागावाटप असेल. ८५-८५-८५ असे एकूण २७० जागांवर यादी बनवलेली आहे. उरलेल्या जागांवर मित्रपक्षांसोबत चर्चा सुरु होईल. या प्रकारे २८८ जागा मविआ पूर्ण ताकदीने लढेल,असे संजय राऊत म्हणाले. नाना पटोले यांनी तीन राजकीय पक्षांची बैठक शरद पवार यांच्यासमोर झाली. ८५-८५-८५ या जागांवर मिळून एकूण २७० जागांवर एकमत झाले आहे. उर्वरित १८ जागांवर शेकाप, कम्युनिस्ट, समाजवादी पक्षांसोबत चर्चा सुरु आहेत. उद्या या जागांवर आमच्यामध्ये स्पष्टता येईल. महाविकास आघाडी म्हणून ही निवडणूक लढत आहोत. महाराष्ट्रात मविआचे सरकार येईल, असे नाना पटोले म्हणाले.

--------------

### बदामराव पंडीतांना गेवराईतून

गेवराई मतदार संघात मनोज जरांगे पाटील यांच्या विचाराचा मोठा प्रभाव असून या मतदार संघातून तुतारीची उमेदवारीसाठी आ. लक्ष्मण पवार, पुजा मोरे यांच्यासह अनेकांची नावे आघाडीवर होते. आ. पवार यांनी तर मंत्री धनंजय मुंडे आणि भाजप नेत्या आ. पंकजा मुंडे यांच्यावर हल्लाबोल करीत निवडणूक न लढवण्याचे जाहीर केले होते. पुढे तुतारीच्या ते मार्गावर असल्याच्या ही चर्चा होत्या. मात्र उमेदवारीच्या स्पर्धेत बदामराव पंडीत यांनी बाजी मारली असून तुतारीच्या इच्छुकांचा मात्र हिरमोड झाल्याचे दिसत आहे.

------------

### केजमध्ये आ.नमिता मुंदडा

यांना भाजपने उमेदवारी दिली नाही. तर भाजप आणि त्यांच्या उमेदवारांना जिल्ह्यात फिरू देणार नाही. तसेच अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या मुद्द्याला हरताळ फासणाऱ्या मुंदडा परिवाराला राजकारणातून हद्दपार करू. असा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आणि भाजप आणि त्यांच्या नेत्या विरुद्ध प्रचंड आक्रोश व्यक्त केला आहे. केज विधान सभेसाठी ना. रामदास आठवले यांनी पप्पू कागदे यांच्या नावाची घोषणा केलेली असताना देखील महायुतीने परस्पर उमेदवारी जाहीर करून मित्र पक्ष रिपांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचा काम केले. या बाबत रिपाइं कार्यकर्त्यात प्रचंड प्रमाणात नाराजी आणि खदखद आहे. त्या निमित्त भाजपने त्यांच्या निर्णयाचा फेर विचार करावा अशी भावना व्यक्त केली. तसेच जर भाजपने त्यांचा निर्णय मागे घेतला नाही. तर जिल्ह्यात कमळ फुलणार नाही आणि फुलू देणार नाही. अशा तीव्र भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या आहेत. पप्पू कागदे हे जनमानसातील नेतृत्व असून तळागाळातील सामान्य माणसांच्या अडीअडचणीच्या प्रसंगी ते धावून जातात. त्यांच्या माध्यमातून जिल्हा आणि राज्यात रिपाइंचे प्रचंड मोठी ताकद निर्माण झालेली आहे. वेगवेगळ्या मोर्चे सभा आंदोलने यांच्या माध्यमातून त्यांनी बहुजन समाजाला न्याय देण्याचे काम केलेले आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी असो की, गायारान हक्क परिषद यांच्या माध्यमातून सर्व समाजाला आणि अठरा पगड जाती धर्माला न्याय देण्याचे काम करीत आहेत. पप्पू कागदे एक.प्रामाणिकणे गेल्या अनेक वर्षा पासून करीत आहेत. केज मतदार संघाचे सक्षम उमेदवार म्हणून त्यांच्या नावाची अनेक वर्षा पासून जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात चर्चा असताना देखील त्यांना डावलले असल्याने मतदार संघात भाजप विरोधात लाट निर्माण झाली आहे. पप्पू कागदे यांच्या समर्थनार्थ केज रिपाइं कार्यकर्त्यांनी केज तालुका अध्यक्ष दिपक कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठक आयोजित केली होती. बैठकीला मराठवाडा संघटक गोवर्धन वाघमारे, जिल्हा संघटक रवींद्र जोगदंड, राजेश सोनवणे, राहूल सरवदे, विकास अरकडे निलेश ढोबळे, दिलीप बनसोडे, गौतम बचुटे यांच्यासह हरेंद्र तुपारे दादाराव धेंडे, गोरोबा बनसोडे, गोरोबा बनसोडे, सूरज काळे, सुरेश गायकवाड, रोहित बचुटे, विनोद शिंदे, शिवाजी बनसोडे, हरीश गायकवाड, विनोद गायकवाड, रघुनाथ ढालमारे, रोहित कांबळे, मधुकर तुपारे, काकासाहेब कांबळे यांच्या तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

**नमिता मुंदडांना निवडणूक जड जाणार !**

मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षण यात आमदार मुंदडा यांची भूमिका रिपाइंचे विरोध यामुळे मुंदडा आणि भाजपला जड जाणार असल्याची लक्षणे दिसून येत आहेत.

**कमळ हद्दपार करू कार्यकर्त्यांची भावना**

बैठकीला जमलेल्या कार्यकर्त्यांनी अत्यंत तीव्र शब्दात भाजपा आणि जिल्ह्यातील नेतांचा निषेध व्यक्त करून कमळ हद्दपार करू अशा भावना व्यक्त केल्या

**दलितांच्या प्रश्नावर आमदारांची भुमिका काय ?**

तालुक्यातील दलितांचे स्मशानभूमीचे प्रश्न, गायारान आणि मराठा व ओबीसी आरक्षण या बाबत त्यांची स्पष्ट भूमिका नसल्याने याचा त्यांच्या मतदानावर परिणाम होवू शकतो.

**पप्पू कागदे आश्वासक चेहरा**

पप्पू कागदे हे जिल्ह्यातील सर्वसमावेशक आणि आश्वासक नेतृत्व असून ओपन, ओबीसी, दलीत, मुस्लिम प्रवर्गातील त्यांना मानणारा प्रचंड वर्ग आहे. त्याचा फायदा त्यांना मिळू शकतो.

'' भाजपने आम्हाला लोकसभा निवडणुकीच्या वेळी केजची जागा देण्याचे आश्वासन देवून ही आमच्या पाठीत खंजीर खुपसला. याचा बदला घेवून आम्ही मुंदडा यांना हद्दपार करू.''

**-दिपक कांबळे, तालुका अध्यक्ष, केज**

---------------

### भारतातील सर्वात मोठा

अंबानी डिफेन्स सिटी मध्येच रिलायन्स डिफेन्स लिमिटेड कंपनी उभारली जाणार आहे. या कंपनीत स्फोटके, दारूगोळा आणि लहान शस्त्रे तयार केली जाणार आहेत. या कंपनीमार्फत दारुगोळा श्रेणीत लहान, मध्यम आणि मोठ्या कॅलिबर आणि टर्मिनली गायडेड म्यूनिशन यांची निर्मीती केली जाणार आहे. स्मॉल आर्म्स पोर्टफोलिओमध्ये सिव्हिल आणि मिलिट्री एक्सपोर्ट मार्केटवर फोकस केला जाणार आहे. या डिफेन्स प्रोजेक्ट अंतर्गत पुढील १० वर्षात कंपनी १०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. या प्रकल्पासाठी जगातील सहा आघाडीच्या संरक्षण कंपन्यांसह करार केला जाणार आहे. रिलायन्स डिफेन्स लिमिटेडला याआधीच सरकारकडून शस्त्रास्त्र निर्मीतीचा परवाना मिळाला आहे. रिलायन्सचा नागपूरच्या मिहानमध्ये फ्रान्सच्या डसॉल्ट एव्हिएशन आणि थेल्स या दोन आघाडीच्या संरक्षण कंपन्यांसोबत यशस्वी संयुक्त उपक्रम सुरू आहे. उत्पादनातील १०० टक्के निर्यात केली जाते. या उपकंपनीद्वारे कंपनीने १००० कोटी रुपयांची संरक्षण उपकरणे निर्यात केली आहेत. अनिल अंबानींची कंपनी कर्जमुक्त झाल्याच्या बातम्या समोर येत आहेत. रिलायन्स इन्फ्राचे शेअर्स ३५० रुपयांवर पोहोचले आहेत.

-----------

cmyk

## ज्ञानसागरचा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील ज्ञानसागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी बीड येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी मुलांनी विविध देशभक्तीपर गीते, कोळीगीते, शेतकरी आत्महत्या, बेटी बचाव, शिवराज्याभिषेक, सर्व धर्म समभाव, आई-वडिलांचे महत्त्व, पोवाडा गायन, नाटिका, नृत्याविष्कार सादर केले. या कार्यक्रमास परीक्षक म्हणून कांता दोडके व मोहन घोडके यांनी काम पाहिले. आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष विजय विद्यागर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून मंदाकिनी आहिरे होत्या. अध्यक्षस्थानावरून आपले मनोगत व्यक्त करताना विजय वाघमारे म्हणाले की, विद्यार्थी जीवनात सांस्कृतिक कार्यक्रमाचे अनन्य साधारण महत्त्व आहे. विद्यार्थ्यांचे कलागुण जोपासण्याचे व वाढवण्याचे काम अशा सांस्कृतिक कार्यक्रमातून केले जाते. अशा कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कलेचा वारसा जपून स्वतःचे कौशल्य विकसित करावे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या कुलकर्णी व राजेंद्र चांदे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशाल देशमुख, अमन शेख, संतोष बागलाने, संतोष बोराटे, रामदास काकडे यांनी परिश्रम घेतले. मोठ्या उत्साहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि.२४ ऑक्टोबर २०२४




# गेवराई मतदारसंघात तीन लाख ७६ हजार ५४७ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

## निवडणुक यंत्रणेचा विभाग सर्व पातळीवर सज्ज-निवडणुक निर्णय अधिकारी

**गेवराई । प्रतिनिधी**

मराठवाड्याचे लक्ष लागलेल्या गेवराई विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, मराठा-ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर यंदाची निवडणूक लक्ष वेधी राहणार आहे. गेवराई विधानसभेच्या निवडणुकी साठी, निवडणुक यंत्राणा पूर्णत: सज्ज झाली आहे. निवडणुक प्रक्रिया लोकशाही पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व उमेदवार आणि मतदार नागरीकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन निवडणुक निर्णय अधिकारी सतीश धुमाळ यांनी केले आहे. दरम्यान, २२ ऑक्टोबर २०२४ रोजी, दिवसभरात ३५ उमेदवारांना ८८ अर्ज देण्यात आल्याची माहिती निवडणुक यंत्रणेकडून जाहीर करण्यात आली आहे. २९ ऑक्टोबर च्या दिवसा पर्यंत ११ ते ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे.



२२८-गेवराई मतदारसंघासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सतीश धुमाळ भूसंपादन उप जिल्हाधिकारी कामकाज पाहत असून, संदीप खोमणे, तहसीलदार गेवराई विक्रम मांडूरके मुख्याधिकारी, गेवराई , श्रीमती वसुधा रहघाटे सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी यांना सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कार्यरत करण्यात आलेले आहे. २२८ - गेवराई मतदारसंघात एकूण मतदान केंद्राची एकूण संख्या ४०४ आहे. त्यापैकी संवेदनशील बूथची संख्या ५० व ५१ आहेत. २२८ गेवराई मतदारसंघाचे आचार संहिता कक्ष तहसील कार्यालय येथे स्थापन करण्यात आले आहे. त्या संदर्भात, एखाद्या उमेदवाराला काही अडचणी आल्यास त्या संदर्भात मार्गदर्शन करण्यात येईल. राजकीय कार्यक्रम घेणे करिता एक खिडकी अंतर्गत परवानगी कक्ष तहसील कार्यालय येथे स्थापन करण्यात आलेला आहे.गेवराई मतदारसंघात एकुण स्त्री पुरूष मतदारांची संख्या तीन लाख ७६ हजार ५४७ आहे. इतर मतदार तीन आहेत. दिव्यांग मतदारांची संख्या १७६८ आहेत. नव मतदार ७६४१ आहेत.मतदान केंद्रावर १७८० अधिकारी कार्यरत राहणार आहेत. अन्य कामासाठी ७५० कर्मचारी कार्यरत ठेवण्यात आलेत. मतमोजणी गढी ता. गेवराई येथील नवोदय विद्यालयात पार पडणार आहे. दरम्यान, गेवराई विधानसभेच्या निवडणुकी साठी, निवडणुक यंत्राणा पूर्णत: सज्ज झाली आहे. निवडणुक प्रक्रिया लोकशाही पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व उमेदवार आणि मतदार नागरीकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन निवडणुक निर्णय अधिकारी सतीश धुमाळ यांनी केले आहे.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष शरद पवार सामाजिक न्याय विभागाच्या प्रदेश सरचिटणीसपदी ॲड.सिद्धार्थ शिंदे

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष शरद पवार सामाजिक न्याय विभागाचे महाराष्ट्राचे प्रभारी तथा राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष शरद पवार महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष भीमराव हत्ती हंबीरे यांनी काल दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी बीड येथील ॲड.सिद्धार्थ शिंदे यांना सामाजिक न्याय विभागाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदावर नियुक्त केल्याची पत्र दिले आहे.



ॲड. सिद्धार्थ शिंदे यांच्या निवडीबद्दल खा. बजरंग बाप्पा सोनवणे, बीडचे आ.संदीप क्षीरसागर ज्येष्ठ विधिज्ञ बाळासाहेब कोल्हे, माजी आमदार उषाताई ठोंबरे, हेमा पिंपळे, भाकपचे ॲड. भीमराव चव्हाण, कॉँग्रेसचे ॲड.राहुल साळवे, ॲड.रोहिदास येवले, ॲड.प्रशांत राजापूरकर, ॲड.विलास जोशी, ॲड.वसंत वडमारे, ॲड. धीरज कांबळे, ॲड.नितीन वाघमारे, ॲड.दीपक तांगडे, ॲड. हेमंत आवटे, ॲड.आर.डी. गायकवाड, ॲड. गोरख खेडकर, ॲड.रामदास सानप, ॲड.फिडेल चव्हाण ॲड.संगीता वीर , ॲड.विद्या गायकवाड, ॲड.छाया वाघमारे, ॲड.भीमा जगताप, ॲड.अक्षय मुळे, ॲड. अभिजीत कदम सर्व मित्रमंडळीने अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

## मुहम्मदिया कॉलनी परिसरात मीटर संख्येनुसार इलेक्ट्रिक पोल व डीपी बसवा

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील मुहम्मदिया कॉलनी परिसरात मीटर संख्येनुसार इलेक्ट्रिक पोल बसविण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सय्यद इलयास यांच्यासह नागरिकांनी महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, कनिष्ठ अभियंता यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.



याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, पेठ बीड भागातील मुहम्मदिया कॉलनी, सय्यद अली नगर रोड, अरीष कॉलनी, तेलगाव नाका, जवळील भागात नवीन पोल वह स्टेट लाइटची व्यवस्था करणे अत्यंत आवश्यक आहे. मुहम्मदिया कॉलनी, मुहम्मदिया मस्जिद हजरत औरंगजेब (र) चौक, जयहिंद शाळा, हज़रत बालेपीर शाळा, मदरसा हज़रत अबूबकर सिद्दिक(र), अरीष मस्जिद, अबू हनिफा मस्जिद, अचानक नगर (मसन वाटा), मिल्लत नगर रोड, जकरिया मस्जिद, अमीर कॉलनी, आरिष चौक, आरीष कॉलनी, बाबामीया कॉलनी, सय्यद अली नगर रोड, अली नगर रोड १ आणि २ एकमिनार मस्जिद, मोमीनपुरा-मुहम्मदिया कॉलनी जोडणाऱ्या नाल्याच्या आजूबाजूला अर्जात नमूद केल्याप्रमाणे मुहम्मदिया कॉलनी परिसरातील नवीन वसाहती असल्यामुळे येथील नागरिकांना विद्युत पोलाची आवश्यकता आहे. येथील वसाहतीत असलेली लोकसंख्या आणि त्या मानाने असलेली विद्युत मीटर संख्या पाहता येथे १२५ पोल ची आवश्यकता आहे. सध्या मात्र या ठिकाणी २५ ते ३० पोल असून त्यावर अतिरिक्त विजेचा भार पडत आहे. हा भार जास्त असल्याने वारंवार लाईट जाणे बिघाड होणे यामुळे या सर्व वसाहती मधील नागरिक मेटाकुटीस आले आहे. ही अवस्था पाहता मुहम्मदिया कॉलनी परिसरात १२५ नवीन पोल आणि आवश्यक संकेत नवीन डीपी लावून नागरिकांना होत असलेला असलेला त्रास दूर करावा असे म्हटले आहे.

## घनसावंगीत महाविकास आघाडीत फूट; शिवाजीराव चोथे यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**घनसावंगी । प्रतिनिधी**

विधानसभा १००-घनसावंगी मतदारसंघांमध्ये नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यात येत असून राजकीय घडामोडीला चांगलाच वेग आला आहे.तर महाविकास आघाडीचे शिवसेना (उबाठा)गटाचे शिवाजीराव चोथे यांनी दि २२ रोजी आपला घनसावंगी विधानसभेसाठी अर्ज दाखल केलाय.त्यामुळे आता घनसावंगीत महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याचे स्पस्ट दिसून येतंय एकीकडे घनसावंगीत महायुतीमध्ये देखील सतीश घाटगे विरुद्ध हिकमत उढाण यांच्यात विधानसभेच्या जागेवरून रस्सीखेच असतानाच आता महाविकास आघाडीमध्ये देखील याच जागेवरून रस्सीखेच होत आहे.शिवसेना उबाठा गटाला घनसावंगीतून जागा मिळावी यासाठी माजी आमदार शिवाजीराव चोथे हे देखील आग्रही भूमिकेत होते मात्र त्यांनी आपला उमेदवारी अर्ज सादर करून राजेश टोपे यांनाच आव्हान केल आहे. त्यामुळे तालुक्यात ओबीसी नेतृत्व म्हणून पहिल्या जाणाऱ्या चोथे यांना ही निवडूक म्हणावी तितकी सोपी जाणार का? असा सवाल उपस्थित होत आहे दरम्यान महायुती मधून इच्छुक असणारे उमेदवार हिकमत उढाण व सतीश घाटगे यांचे मात्र मतदारसंघांमध्ये गाठीभेटीचे दौरे वाढले असून घनसावंगीत भाजपाला जागा न सुटल्यास घाटगे यांची भूमिका काय असेल याकडे जरी लक्ष लागले असले तरी शिवसेना(उबाठा)गटाचे चोथे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्याने ओबीसी मतदार आता शिवाजीराव चोथे यांना स्वीकारणार का हे देखील पाहणं तितकंच महत्त्वाचं ठरणार आहे.

## भ्रष्टाचारी धनदांडग्या लोकांना पाठीशी घालणाऱ्या महायुतीच्या सरकारला हद्दपार करा - जी.रुद्रा राजु

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात महायुती सरकारने मोठ्या प्रमाणात घोटाळे केले असून जे इंग्रजांनाही जमले नाही ते महायुतीच्या महाभ्रष्टाचार्यांनी यांनी करून दाखवले आहेत. अनेक उद्योगधंदे राज्याच्या बाहेर घालून महाराष्ट्राला उतरती कळा आणण्याचे काम केले आहे. या भ्रष्ट असणाऱ्या महायुतीच्या सरकारला या विधानसभा निवडणुकीत त्यांची जागा दाखविणार असून महाविकास आघाडी सत्तेत येणार असल्याचा विश्वास अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे बीड जिल्हा पक्ष निरीक्षक तथा काँग्रेसचे कार्यकारणी सदस्य जी.रुद्रा राजु यांनी केले.ते आष्टी येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.



पुढे बोलताना जी रुद्रा राजू म्हणाले की, महाराष्ट्रमध्ये महायुती सरकारच्या काळात मोठ्या प्रमाणात आत्महत्या झाल्या आहेत. दिवसाला सात याप्रमाणे आत्महत्या झाल्या असून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यास हे भ्रष्ट सरकार अपयशी ठरविले आहे. सोयाबीनचे भाव कमी झाल्याने शेतकऱ्यांवर वाईट वेळ आली आहे. सोयाबीनवर निर्यात शुल्क वाढविल्यामुळे शेतकऱ्यांना कवडीमोल दराने दर मिळत आहे .महाराष्ट्राच्या संस्कृतीला तडे जाण्याचे काम या सरकारने केले आहे. महिलावर अत्याचाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. रोजगार नाहीत अनेक कंपन्या राज्याबाहेरून गुजरात मध्ये गेले आहेत. दलितांवर अत्याचार होत आहेत. तसेच ग्रामीण भागामध्ये नागरिकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. राज्यात कोणत्याही शैक्षणिक सवलती नसल्याने गोरगरीब लेकरांचे वाटोळे होत आहे. त्याचबरोबर २०१४ च्या तुलनेमध्ये गेल्या दहा वर्षांमध्ये केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणावर महागाई वाढविल्याने सर्वसामान्यांचा खिसा कापला गेला आहे. जीएसटी मुळे सर्वसामान्य नागरिकांसह व्यापारी वर्ग ही हैराण झाला असून आमचे सरकार आल्यास जीएसटी धोरणात बदल घडवून सर्वसामान्यांना दिलासा देणार असल्याचे म्हटले आहे. तसेच बीड जिल्ह्यात काँग्रेस पक्ष दोन जागा लढविणार असून लवकरच त्याबद्दल घोषणा करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. या पत्रकार परिषदेला जिल्हा काँग्रेस कमिटीच्या महिला अध्यक्ष मीनाक्षीताई पांडुळे, युवकचे प्रदेश सरचिटणीस राहुल टेकाळे ,शेख नौशाद, रामेश्वर शेळके ,महादेव शिर्के, अशोक केदार ,जिल्हा सरचिटणीस भास्कर केदार ,नवनाथ थोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

## आदर्श इंटरनॅशनल स्कुलची ३६ विद्यार्थ्यांची कुवेतसाठी निवड

**अंबड । प्रतिनिधी**

आदर्श इंटरनॅशनल स्कुल पारनेर (ता.अंबड) येथे पारितोषिक वितरण समारंभ दिमाखात संपन्न झाला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थापक अध्यक्ष मा.श्री.अशोक लांडे सर प्रमुख पाहुण्या संस्थेच्या सचिव सौ.शिलाताई लांडे मॅडम यांची उपस्थिती होती.



''रंगोत्सव''ऑर्गनायझेशन फॉर नॅशनल लेवल आर्ट कॉम्पिटिशन मुंबई तर्फे आयोजित या स्पर्धेत आदर्श इंटरनॅशनल स्कुलच्या १०५ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यापैकी तब्बल ७७ विद्यार्थ्यांनी रंगोत्सव स्पर्धेत बाजी मारत यश संपादन केले.यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा स्कुलच्या प्रार्थना मैदानात प्रमाणपत्र विविध ट्रॉफीज,गोल्ड मेडल,सिल्वर मेडल,ब्रांज मेडल अशा विविध प्रकारच्या पारितोषिकांनी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री.अशोक लांडे सर यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.तसेच ३६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.मंथन, कराटे या स्पर्धेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा देखील अध्यक्ष सरांच्या हस्ते संन्मानित करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापिका सौ.गीता जाधव मॅडम,व कला शिक्षिका कु. वैष्णवी कदम मॅडम यांना देखील अध्यक्ष सरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापिका सौ.गीता जाधव मॅडम,उपमुख्याध्यापक श्री. भाऊसाहेब बारहाते सर, वस्तीगृह अधिक्षक सौ. शितल टकले मॅडम, सौ. रेणुका कुलकर्णी मॅडम, श्री. प्रविण राठोड सर,श्री. श्रीकांत देशमुख सर,श्री. योगेश सुर्यवंशी सर, सौ. प्रतिभा मॅडम,श्री. सोमेश शिमरे सर,श्री. अर्जुन गव्हाणे सर, ,श्री. गणेश वाघ सर,हाजी सदफ शेख मॅडम,वैष्णवी कदम मॅडम,सौ. कोमल गाडेकर मॅडम,श्री. राम हामने सर, श्री.निखील पाटील सरसौ. संध्या नवले मॅडम श्री. अक्षय घाणे सर आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन हाजी सदफ शेख मॅडम यांनी केले. तर आभार प्रतिभा सुर्यवंशी मॅडम यांनी मानले.

## चौसाळा येथील व्यापारी सुभाष बेदमुथा यांचे निधन

**चौसाळा । प्रतिनिधी**

येथील जैष्ठ नगरिक तथा सीमेंट.तथा किराना माला सह इतर व्यावसाय कारणारे व्यापारी शुभाष खेमचंद बेदमुथा यांचे नुकतेच



रुदय विकाराच्या झटकयाने दी २३/१०/२०२४ रोजी दुःखद निधन झले मृत्यु समई ते ६९ वर्षाचे होते स्व. शुभाष बेदमुथा हे चौसाळा येथील जैन श्रवक संघाचे आध्यक्ष असुन महाविर गौरक्षण सौस्था चौसाळा सौस्थेचे कोष आध्यक्ष होते त्याचा स्वभाव स्वयामि व शांत होता त्यांच्या मागे पत्नी मुलगा अनुप बेदमुथा तीन मुलि सून. नातवंडे आदि परिवार आहे त्यांच्या अंत्य विधीला गावातील मारवाड़ी समजातील नागरिका सह इतर हि मन्यवर अवर्जुन उपस्थित होते यांच्या निधना बद्दल गावात हळहळ व्यक्त केली जाते

पान ६ वरून...

### मी चक्रव्यूहात सापडेल

विश्वास मी कायम टिकवून ठेवीन असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले.छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये परळी विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील व मराठवाड्याच्या इतर भागातीलही असंख्य विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या उत्साहात या कौटुंबिक स्नेह मेळाव्याला प्रचंड मोठ्या संख्येने हजेरी लावलेली पाहायला मिळाली. पुढील काही दिवसात विधानसभेची निवडणूक आहे, मी आज जो काही आहे तो तुमच्या प्रेम आशीर्वाद व मतदानाच्या जीवावर आहे. ज्याला तुम्ही उभे केले त्याचे अस्तित्व नष्ट करण्याचा अधिकार देखील तुम्हाला आहे, तो अधिकार तुम्ही इतर कुणालाही हिरावून घेऊ देणार नाहीत हा मला ठाम विश्वास आहे असेही यावेळी धनंजय मुंडे म्हणाले.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी कॉँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष सुनील मगरे, राष्ट्रवादी कॉँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष अभिजीत देशमुख, राष्ट्रवादी कॉँग्रेस व्ही जे एन टी विभागाचे प्रदेशाध्यक्ष रविकांत राठोड, अजय मुंडे, कन्नडचे नगराध्यक्ष संतोष कोल्हे, केंद्रे साहेब, प्राचार्य श्रीनिवास दराडे, सुरेश वानखेडे, संयोजक दत्ता भांगे, ज्ञानेश्वर ढाकणे, राजू सानप, वैजयंतीताई मिसाळ यांसह आदी उपस्थित होते यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### गेवराई विधानसभेच्या

दरम्यान मयुरीताई यांना उमेदवारी जाहीर झाल्याने गेवराईतील प्रस्थापित पंडित-पवार यांना तगड्या उमेदवार ठरु शकतात अशी चर्चा होत आहे.

राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजलेला असून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सध्या राज्यातील प्रमुख पक्षाकडून विधानसभानिहाय उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येत आहे. यामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी स्वबळावर विधानसभा निवडणूका लढविण्याची घोषणा केलेली असून त्यांनी मंगळवारी रात्री उशिरा राज्यातील ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. या यादीत गेवराई विधानसभेची उमेदवारी मयुरीताई मस्के यांना देण्यात आली आहे. दरम्यान मयुरीताई मस्के व बाळासाहेब मस्के यांनी समाजसेवेचा वसा हाती घेऊन तालुक्यात गोरगरीबांची सेवा करत पुण्याचे काम केलेले आहे. तसेच शेतकरी, कष्टकरी, सुशिक्षित बेरोजगार यांच्या प्रश्नांची जाणीव समोर ठेवून काम करत असलेल्या मस्के दाम्पत्यांची दस्तुरखुद्द मनसेचे संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांनी दखल घेऊन मयुरी मस्के यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे गेवराई विधानसभेत आता मयुरी मस्के यांनी पंडित-पवारांना आव्हान उभे केले असून तालुक्यात त्यांच्या उमेदवारीने उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### पालकमंत्र्यांच्या मतदारसंघात

आणि भ्रष्टाचाराचे साम्राज्य फोफावले आहे. सिरसाळा ही सर्वात मोठी ग्रामपंचायत असून, पालकमंत्री सदरील ग्रामपंचायत त्यांच्या ताब्यात असल्याचा अनेकवेळा दावा करतात. मात्र गोरगरीब कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाचा प्रश्न मार्गी लावू शकत नाहीत याचे आश्चर्य वाटते. त्यांच्या वेतनाचा प्रश्न मार्गी न लागल्यास गोरगरिबांची दिवाळी अंधारात होणार का? असा थेट सवाल राजेभाऊ फड यांनी प्रशासनासमोर निर्माण केला आहे. कर्मचाऱ्यांचा प्रश्न निकाली लागेपर्यंत आमचा त्यांना पाठिंबा असल्याचेही आश्वासन त्यांनी दिले.

### अनुवंशिक बदलातील परीमान

विश्लेषक यंत्राच्या माध्यमातून शोधणे सोयीस्कर होणार आहे . डॉ नवनाथ काशीद व त्यांच्या सहकारी संशोधक बांधवांचे संस्थेच्या वतीने श्री रमेशरावजी आडसकर , सचिव श्रीमती अर्चनाताई आडसकर संचालिका, श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस तसेच बाबुरावजी आडसकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव फावडे व सर्व कर्मचारी प्राध्यापक बंधूंच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

### परतुर मतदारसंघात १ लाख

देवेंद्रजी फडणवीस यांनी परतुर विधानसभा मतदारसंघातील मंठा व परतुर तालुक्यासाठी प्रत्येकी ८० कोटी रुपये एवढा निधी उपलब्ध करून दिला असल्याची माहिती महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आज आपल्या भाषणात दिली. ते बदलापूर येथील वरद मंगल कार्यालयात आयोजित भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत असताना बोलत होते. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत परतुर तालुक्यात एकूण ४९३७० मंठा तालुक्यात ४६,७५० तर जालना तालुक्यातील नेर व सेवली सर्कल १४६०० अशा परतूर विधानसभा मतदारसंघातील ११०७२० महिला लाभार्थ्यांच्या बचत खात्यात ८३ कोटी ४ लाख रुपये जमा झाले असून महाराष्ट्र सरकारने या योजने करिता चाळीस हजार कोटी रुपये ची आर्थिक तरतूद केलेली असल्याने विरोधकांनी योजना बंद होणार असल्याच्या कितीही वावड्या उठवल्या तरी ही मात्र मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना बंद होणार नसल्याचे यावेळी आमदार लोणीकर यांनी नमूद केले. या प्रसंगी भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुलभैय्या बबनराव लोणीकर यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांची प्रमुख उपस्थिती होती.

### खोलेश्वर माहाविद्यालयाच्या

मिटर अडथळा या स्पर्धेमध्ये तृतिय पारितोषिक प्राप्त केले व त्यांची ऑल इंडिया विदयापीठ स्पर्धेमध्ये निवड झाली .

याबरोबरच जे .एस . कॉलेज, जालना येथील होणाऱ्या सेंन्ट्रल झोन स्पर्धेसाठी चार खेळाडूंची निवड झाली . तसेच बीड येथील सेन्ट्रल झोन संघाचे व्यवस्थापक म्हणून प्रा . राहूल चव्हाण यांची निवड झाली . या यशाबद्दल भा.शि.प्र. संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, प्रशासकीय समितीचे समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष राम कुलकर्णी, प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी तसेच उपप्राचार्य, पर्यवेक्षक , व सर्व प्राध्यापक , शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले . व त्यांना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या . या विद्यार्थ्यांना क्रिडा विभाग प्रमुख प्रा.राहूल चव्हाण व डॉ. माणिक पोखरकर यांचे मार्गदर्शन लाभले .

## मनुष्यबळाचे प्रथमस्तरीय सरमिसळीकरण पूर्ण

बीड :-बीड जिल्ह्यातील विधानसभा मनुष्यबळाचे पहिले सरमिसळीकरण मंगळवारी (ता. २२) जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक यांच्या उपस्थितीत पूर्ण झाले. या सरमिसळीकरणाप्रसंगी निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे उपस्थित होते. विधानसभेची निवडणूक २० नोव्हेंबरला होत आहे. या निवडणुकीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांचे सरमिसळीकरण पूर्ण झाले आहे. यामध्ये जिल्ह्यात तीन हजार एक मतदान केंद्राध्यक्ष, प्रथम मतदार अधिकारी तीन हजार चार आणि इतर मतदार अधिकारी सहा हजार ३५७ असे एकूण १२ हजार ३६२ अधिकारी कर्मचाऱ्यांचा समावेश होता. यातील गेवराई १९६२, माजलगाव २०४२, बीड २२८३, आष्टी २४९८, केज २०२९, परळी विधानसभा मतदार संघातील १५४८ अधिकारी, कर्मचारी आहेत.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
गुरूवार दि.२४ ऑक्टोबर २०२४


# शेतकऱ्यांसाठी येणाऱ्या युरियाचा उद्योगासाठी वापर

## कृषी विभागाची मोठी कारवाई

शेतकऱ्यांसाठी येणाऱ्या अनुदानित युरियाचा काळाबाजार करुन तो उद्योगासाठी वापरणाऱ्या रॅकेटचा बीडच्या कृषी विभागाने पर्दाफाश केला आहे. आष्टी तालुक्यातील घाटापिंप्री येथे टाकलेल्या धाडीत हा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या तपासात मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांसाठी येणाऱ्या युरियाची अनेकदा टंचाई जाणवते. यामागे होणारा काळाबाजार कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी उघडकीस आणला आहे. बीड-अहमदनगर रोडवर घाटापिंप्री शिवारात आबासाहेब शेळके यांच्या गोठ्याशेजारी असलेल्या खोलीची पाहणी केली असता त्या ठिकाणी युरियाच्या पन्नास भरलेल्या आणि रिकाम्या ७४४ बॅग आढळून आल्या. यानंतर त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने तेथून जवळच असलेल्या खंडोबा वस्ती परिसरातील शरद घोडके यांच्या नव्याने बांधकाम झालेल्या इमारतीमध्ये असलेल्या साठ्याबाबत माहिती दिली. त्या ठिकाणी देखील पॅकींगचे साहित्य आढळून आले. या कारवाईत १ लाख ४० हजार ६८९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आबासाहेब शेळके याच्या विरोधात अंभोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अधिक तपास पोलिस करत आहेत.शेतकऱ्यांसाठी येणारा युरिया हा अनुदानित असतो. शेतकऱ्यांना ही बॅग २६६ रुपयांना मिळते. याची मुळ किंमत २२५७ रुपये आहे. तर उद्योगाच्या वापरासाठी येणारा युरिया हा वेगळ्या पॅकींगमध्ये येतो, त्यावर कोणतेही अनुदान नसते. किंमतीत असलेल्या मोठ्या फरकामुळे याचा काळाबाजार करुन शेतकऱ्यांसाठी येणारा युरिया उद्योगासाठी पुरवण्याचा गोरखधंदा आष्टीत सुरु होता. हा युरिया प्लायवुड आणि पेंट इंडस्ट्रीसाठी पाठवला जात होता. आता हा प्रकार उघडकीस आल्याने सदर आरोपीने तो कोठून खरेदी केला आणि कोठे पाठवला, याबाबतची माहिती समोर येऊ शकणार आहे. रासायनिक खतांचा मोठ्या प्रमाणामध्ये वापर रासायनिक खतांचा मोठ्या प्रमाणामध्ये वापर होत आहे. दिवसेंदिवस



उत्पादकता आणि जमिनीचा पोत खराब होत आहे. याबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. मात्र, याबाबत कुठलेही मार्गदर्शन अथवा सल्ला मिळत नसल्याने दिवसेंदिवस खतांचा वापर वाढत आहे, असेही काही शेतकऱ्यांचे म्हणने सुद्धा आहे. शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळले पाहिजे, रासायनिक खतांचा अतिवापर जमिनीचा पोत बिघडू शकतो. त्यामुळं आवश्यक असल्यास तरच रासायनिक खतांची मात्रा द्यावी, अन्यथा सेंद्रिय शेती करण्याचं आवाहन करण्यात येत आहे. महाराष्ट्रात देखील गेल्या दोन दशकांमध्ये रासायनिक खतांचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला आहे.

## नफा सोडा उत्पादन खर्चही निघणं कठीण, सोयाबीन उत्पादक संकटात

सध्या राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. कारण सोयाबीनच्या दरात कमालीची घसरण झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. शुभारंभालाचा सोयाबीनला कमी दर मिळत असल्यानं सोयाबीन उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. सध्या यवतमाळ जिल्ह्यात सोयाबीनला ३ हजार ८०० ते ४ हजार १०० रुपयांचा प्रति क्विंटलला दर मिळत आहे. मात्र, मिळालेल्या या दरात शेतकऱ्यांना नफा तर सोडात पण त्यांचा उत्पादन खर्चही निघत नाही. त्यामुळं शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केलाय.

खरीपातील नगदी पीक म्हणून शेतकरी सोयाबीनची लागवड करतात. नव्याने निघालेले सोयाबीन बाजार समितीत विक्रीसाठी आले असता शुभारंभालाच ३ हजार ८०० ते ४ हजार १०० रुपयांचा क्विंटलला दर मिळत आहे. यामुळं शेतकऱ्यांमध्ये सरकारच्या धोरणांवर संताप व्यक्त होत असून, यातून सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होत आहे.

तेल आणि सोयाबीन ढेप आयात, दरांवर परिणाम



यवतमाळ जिल्ह्यात यावर्षी ३ लाख ८० हजार हेक्टरवर सोयाबीनची लागवड झाली आहे. मागच्या वर्षी सोयाबीनला ६ हजार रुपये क्विंटलपर्यंतचा भाव होता. यावर्षी सुरुवातीलाच ३८०० रुपये क्विंटलचा भाव मिळत आहे. यामुळे सोयाबीनची सोंगणी करायची की नाही, असा प्रश्नही शेतकऱ्यांपुढे निर्माण झाला आहे. केंद्र शासनाने सोयाबीन तेल आणि डीओसी आयात करण्याचे धोरण जाहीर केले आहे. तेल आणि सोयाबीन ढेप आयात होत असल्याने बाजारात सोयाबीनचे दर पडले आहेत. पुढील काळात हे दर काय असतील हे सांगणे सध्या तरी अवघड आहे.

दसरा दिवाळी या सणांच्या तोंडावर महागाई कमी करताना शेतकऱ्यांच्या शेत-मालावर त्यांचे गंभीर परिणाम होतानाचे चित्र बाजारात पहायला मिळत आहे. यातून शेतकयांना आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत आहे.

## जनावरांतील आजारावर औषधी वनस्पतींचे उपचार

जनावरांच्या दैनंदिन व्यवस्थापनात किंवा आजारांवर उपचार करताना घरगुती पद्धतीने वनौषधींचा वापर केल्यास खर्च कमी करता येतो. मात्र सांसर्गिक आजाराची तीव्र लक्षणे असलेल्या जनावरांवर पशुवैद्यकांकडून उपचार करून घ्यावेत.अतिसार आजार : १) निकृष्ट किंवा खराब, बुरशीजन्य चारा किंवा खाद्य जनावरांनी खाल्ल्यास पोटात अपचन होऊन जनावरांना हगवण लागते. हगवण ३ दिवसांपेक्षा अधिक दिवस असल्यास शरीरातील पाणी आणि इतर शारीरिक पोषक कमी होऊन जनावरे अशक्त व कमजोर होतात. उपचार : १) एक ओंजळ चांगले बारीक दळलेले कोवळे डाळिंब, पेरू, कडुनिंबाची पाने, ५० ग्रॅम सुंठ पावडर आणि १०० ग्रॅम गूळ या मिश्रणाच्या बोराच्या आकाराच्या गोळ्या तयार कराव्यात. २) ३ गोळ्या एकावेळेस याप्रमाणे दिवसातून ३ वेळा हगवण बरी होईपर्यंत जनावरांना खायला द्यावेत. ३) जनावराच्या शरीरातील पाणी कमी झाले असल्यास पाणी, साखर व मीठ यांचे द्रावण पाजावे. गोचीड नियंत्रण : १) जनावरांना गोचीड ताप येतो. शारीरिक वाढ खुंटून जनावर बारीक दिसते. दुधाळ जनावरांच्या दुग्ध उत्पादनात लक्षणीय घट होते.उपचार : १) प्रत्येकी २० ग्रॅम आले, तुळस, कडुनिबांची पाने, हळद पावडर आणि सीताफळाच्या बिया एकत्रितपणे चांगल्या बारीक करून २५० मिलि. कडुनिबांच्या तेलात उकळावे आणि थंड झाल्यावर तयार मिश्रण जनावरांच्या शरीराला लावावे.

विषबाधा : १) जनावरे कुरणांवर चरताना काही विषयुक्त पदार्थ किंवा विष खाल्ल्यामुळे विषबाधा होते आणि वेळीच योग्य उपचार



नाही मिळाल्यास जनावरे दगावतात. सौम्य स्वरूपाच्या विषबाधेवर घरगुती उपचार करता येतात. उपचार : १) १० ग्रॅम विड्याची पाने, तुळशीची पाने, काळी मिरी व सुंठ एकत्रित बारीक करून कोमट पाण्यात मिसळून जनावरांना त्वरित पाजावे.

२) विषबाधा तीव्र स्वरूपाची असल्यास ताबडतोब पशुवैद्यकीय उपचार करावे. वंध्यत्व : १) गायी-म्हशी वांझ राहतात किंवा माजावर येत नाहीत किंवा वारंवार माजावर येतात किंवा काही जनावरांचा माज मुका असतो. उपचार : १) कोरफडीचे ३ पाने उपाशापोटी ३ दिवस खायला द्यावीत. सोबतच कोंब आलेले हरभरा किंवा बाजरी किंवा गहू १५ दिवस वंध्यत्व असलेल्या जनावरांना खाऊ घालावेत. जर १५ दिवसांनी जनावर माजावर आल्यास फळविण्याच्या अगोदर १५० मिलि कडुनिबांचे तेल पाजावे. वार न पडणे : १) गाय, म्हैस व्याल्यानंतर ३ ते ४ तासांत गर्भाशयातून वार पडणे हे विण्याची क्रिया बरोबर झाली याचे प्रमुख लक्षण आहे. परंतु काही वेळा गर्भाशयात वार अडकून राहते किंवा अर्धवट बाहेर लोंबकळत राहिल्याने वार गर्भाशयात सडण्याची प्रक्रिया सुरू होते. २) गर्भाशयात जंतुसंसर्ग होऊन जनावरांच्या उत्पादन आणि प्रजोत्पादन क्रियांवर भविष्यात विपरीत परिणाम होतो. अर्धवट बाहेर लोंबकळलेल्या वाराला ओढाताण करू नये. वाराच्या बाहेरील टोकाला कुठलीही जड वस्तू बांधू नये. कुत्री वाराला ओढाताण करणार नाहीत याची दक्षता घ्यावी. उपचार : १) जर वार चार तासांत बाहेर न पडल्यास तीळ किंवा गोखरूच्या झाडांच्या पानांचा लगदा (३०० ते ४०० ग्रॅम) करून एक लिटर कोमट पाण्यात मिसळून पाजावा. २) उपचारानंतर १ तासात सुद्धा वार न पडल्यास पशुवैद्यकांना बोलावून वार काढून उपचार करावेत. मायांग बाहेर येणे : १) गाई, म्हशींच्या शरिरात संप्रेरकीय असंतुलनामुळे गाभण कालावधी किंवा व्याल्यानंतर लगेचच मायांग बाहेर येते. बाहेर आलेले मायांग लवकर आत न घातल्यास जंतुसंसर्ग होऊन जनावरांचा मृत्यू होतो. उपचार : १) सौम्य प्रकारे मांयाग बाहेर आल्यास सर्वप्रथम स्वत:चे हात जंतुनाशकाच्या द्रावणाने स्वच्छ धुवावे. बाहेर आलेल्या मायांगाला साखरेच्या पाण्याने स्वच्छ करून केळीच्या पानांनी उचलून व्यवस्थित आत घालावे. २) तोंडाकडे उतार राहील अशा रीतीने जनावरांना काही दिवस बांधावे. २ ओंजळ लाजाळूची पाने बारीक करून २०० मिलि शेळीच्या दुधात मिसळून दिवसातून ३ वेळा ५ दिवस पाजावे. दूध वाढीसाठी उपाय : १) तीन चमचे शतावरीच्या मुळांचा पावडर ३०० ग्रॅम करडईच्या ढेपेत मिसळून १५ दिवस दुधाळ जनावरांना खाद्यात दिल्याने दूध उत्पादनात वाढ होऊन दूध देण्याचा कालावधी वाढतो.

## तूर पिकातील खोड करपा, मर रोगावरील उपाययोजना

तूर या कडधान्य पिकाचे मर व खोड करपा या रोगामुळे तूर पिकामध्ये मोठे नुकसान होते. सध्या बहुतांश तूर पीक हे शेवटच्या टप्प्यात म्हणजेच फुले लागण्याच्या व शेंगा भरण्याच्या अवस्थेत आहे. दरवर्षी फेरपालट न करता एकच पीक घेणे, बदलते वातावरण यामुळे तूर पिकावरील जैविक व अजैविक ताण वाढत आहे. त्यातच या वर्षी काही ठिकाणी पेरणी झाल्यानंतर पीक रोपावस्थेत असताना आवश्यकतेपेक्षा जास्त पाऊस झाला. पुढे ऑगस्ट महिन्यामध्ये पावसाचा मोठा खंड पडून, पुढेही अनेक खूप जास्त पाऊस झाला. अशा विषम स्थितीमध्ये तुरीचे पीक वाळल्याचे आढळले. काही तपासणीअंती पिकावर खोडावरील करपा व मर या रोगांचा प्रादुर्भाव झाला असल्याचे दिसून आले. या रोगाची लक्षणे जाणून त्वरित उपाययोजना करणे गरजेचे आहे.

(१) मर रोग : हा रोग जमिनीत वास्तव्य करणाऱ्या फ्युजारियम उडम या बुरशीमुळे होतो. जमिनीचे तापमान २५ ते २८ अंश सेल्सिअस व ओलावा २० ते २५ टक्के असल्यास मर रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होतो. तूर पिकामध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव रोपावस्थेपासून ते फुले व शेंगा येईपर्यत होतो. शेंगा परिपक्व होण्याच्या कालावधीत प्रादुर्भाव झाल्यास उत्पादनात मोठी घट येते. मागील वर्षीच्या पीक अवशेषांमध्ये बुरशी सुप्तावस्थेत राहून पुढील वर्षी तुरीमध्ये रोग उद्भवू शकतो. या बुरशीच्या प्रादुर्भावामुळे पिकास पाणी दिले तरी वर पानांपर्यंत पाण्याचे वहन होत नाही.

लक्षणे : पानाच्या शिरा पिवळ्या होतात. पाने पिवळी पडतात. झाडाचे शेंडे मलूल होतात व कोमेजतात. झाड हिरव्या स्थितीत वाळते.



जमिनीलगतचा खोडाचा भाग काळ्या रंगाचा बनतो. मूळ उभे चिरून पाहिले असता मुळाचा मध्य भाग काळा दिसतो. यात बुरशीची वाढ झालेली दिसते. कधी कधी खोडावर पांढरी बुरशीसुद्धा आढळते. वाळलेल्या झाडाची पाने गळत नाही. तसेच रोगाची तीव्रता पीक फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेत जास्त असते. झाड मरते.

मर रोगाचे एकात्मिक व्यवस्थापन : मध्यम व उशिरा परिपक्व होणाऱ्या वाणांमध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव जास्त आढळून येतो. सलग तुरीचे पीक घेण्यापेक्षा ज्वारीचे आंतरपीक घेतल्यास मर रोगाचा प्रादुर्भाव कमी असतो. पाणी साचणाऱ्या व पाण्याचा निचरा न होणाऱ्या जमिनीत तुरीचे पीक घेऊ नये. ज्या शेतामध्ये पूर्वी मर रोगाचा प्रादुर्भाव झालेला असेल, अशा शेतात तूर पीक पुढील किमान चार ते पाच वर्षे घेऊ नये. या क्षेत्रात तुरीऐवजी तृणधान्य पिके घ्यावीत. शेतामध्ये मर रोगाची रोगट झाडे दिसताच त्वरित उपटून टाकावी. मर रोगग्रस्त शेतात २ किलो ट्रायकोडर्मा चांगल्या कुजलेल्या २०० किलो शेणखतात मिसळून पिकात द्यावा.

(२) खोडावरील करपा : (अ) कोलेटोट्रायकम करपा : हा रोग कोलेटोट्रायकम डिमँशियम या बुरशीमुळे होतो. खोडावर, फांद्यावर काळ्या करड्या रंगाचे चट्टे आढळतात. रोगाची तीव्रता अधिक असल्यास फांद्या व झाडे वाळतात.

ब) फायटोप्थोरा करपा : हा रोग फायटोप्थोरा या बुरशीमुळे होतो. सततचा रिमझिम पाऊस पडत राहिल्यास या रोगाचा प्रादुर्भाव झपाट्याने होतो. वातावरणातील आर्द्रता ८० ते ८५ टक्के व २२ ते २५ अंश तापमान ही परिस्थिती या रोगाचा प्रादुर्भाव वाढण्यास कारणीभूत ठरते. पाण्यातून व हवेद्वारे या रोगाच्या बीजाणूंचा प्रसार होतो.

लक्षणे : या रोगामुळे पानावर ओलसर चट्टे, खोडावर जमिनीलगत जमिनीपासून काही इंच अंतरावर तपकिरी चट्टे आढळतात. नंतर हे चट्टे वाढत जाऊन खोडाभोवती खोलगट भाग तयार होतो. काही वेळा खोडावर गाठी तयार होतात. अनुकूल वातावरणात या चट्ट्यांवर पांढरट गुलाबी रंगाची बुरशी वाढलेली दिसून येते. हे चट्टे वाढत जाऊन झाडाच्या मुख्य बुंध्याला वेढतात, त्यामुळे झाड कमकुवत होऊन त्या ठिकाणी चटकन तुटते. या खोडाच्या चट्ट्याचा उभा छेद घेतल्यास खोडाचा आतील भाग तपकिरी काळा पडल्याचे दिसते. बरेचदा खोडावर २ ते ३ मिलिमीटर खोल व २ ते ४ सेंटिमीटर लांब भेगा पडलेल्या दिसतात. या रोगामध्ये झाडे लवकर वाळतात.

करपा रोगाचे एकात्मिक व्यवस्थापन : पाणी साचणाऱ्या व पाण्याचा निचरा न होणाऱ्या जमिनीत तूरचे पीक घेऊ नये. पाऊस जास्त पडल्यास शेतात चर खोदून अतिरिक्त पाणी शेताबाहेर काढावे. रोगग्रस्त शेतात ट्रायकोडर्मा ४ ग्राम प्रति लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी. रोग दिसताच प्रामुख्याने खोडावर व फांद्यावर मेटॅलॅक्झील (४ टक्के) अधिक मॅन्कॉझेब (६४ टक्के डब्ल्यू. पी.) (संयुक्त बुरशीनाशक) २ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. आवशकता भासल्यास ८ ते १० दिवसांनी पुन्हा फवारणी करावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९९८ : समाजसेविकांना दिला जाणारा अहल्यादेवी होळकर पुरस्कार आंबेडकरी चळवळीतील नेत्या आणि कार्यकर्त्या शांताबाई दाणी यांना प्रदान.
१९९२ : वैज्ञानिक संशोधनासाठीचा जी. डी. बिर्ला पुरस्कार हैदराबाद विद्यापीठातील प्राध्यापक गोवर्धन मेहता यांना जाहीर.
१९९२ : कवी विंदा करंदीकर यांची साहित्यक्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल कोणार्क पुरस्कारासाठी निवड जाहीर.
१९९२ : देवगड तालुक्यातील कवी माधव यांना पहिला कवी माधव पुरस्कार जाहीर.
१९९६ : इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशनचा आशुतोष मुकर्जी स्मृती पुरस्कार ख्यातनाम अणूशास्त्रज्ञ राजा रामण्णा यांना जाहीर.
१९७१ : डी. बी. कुपर याने चोरलेल्या २ लाख अमेरिकन डॉलर सह नॉर्थवेस्ट ओरीएंट एरलाईन्सच्या विमानातून पॅराशूटच्या सहाय्याने उडी मारली. अद्याप शोध लागलेला नाही.
१८६४ : जळगाव नगरपालिकेची स्थापना.
१९४४ : दुसरे महायुद्ध ८८ अमेरिकन विमानांनी टोकियोवर तुफानी बॉम्बवर्षाव केला.
१७५० : महाराणी ताराबाईंकडून छत्रपती राजारामास कैद.
१६०५ : मुघल सम्राट जहांगिरने आग्र्याची गादी सांभाळली.
१९०९ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी बॅ. गांधी यांच्या अध्यक्षतेखाली लंडनमध्ये प्रथमच दसर्याचा उत्सव साजरा केला.
१९४५ : संयुक्त राष्ट्रांची स्थापना झाली.
१९६३ : देशात असलेल्या दुष्काळामुळे सार्वजनिक व मोठया समारंभात तांदळाच्या पदार्थावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली.
१९६४ : उत्तर होंडेशियाला (युनायटेड किंगडमपासुन) स्वातंत्र्य मिळाले व त्याचे झांबिया असे नामकरण करण्यात आले.
१९७२ : दुष्काळग्रस्त गुरे वाचवण्यासाठी 'सकाळ रिलीफ फंड' या संस्थेतर्फे 'दत्तक बैल योजना' सुरू करण्यात आली.
१९८४ : भारतामधे प्रथमच भुयारी रेल्वे कोलकाता येथे सुरू झाली.
१९९७ : सतारवादक पंडित रविशंकर यांना संगीतक्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जपानचा 'प्रिमियम इंपिरिअल आंतरराष्ट्रीय पुरस्कार' प्रदान
२००० : थोर समाजसेवक बाबा आमटे यांना केन्द्र सरकारचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार' जाहीर झाला. ६ डिसेंबर २००० रोजी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.
२००१ : सलमान खान यांचा पुन्हा जमीन मंजूर आणि सुटका.
२००३ : कॉनकॉर्ड विमानची शेवटची व्यावसायिक उड्डाण झाली.
२०१६ : सायरस मिस्त्री यांची टाटा समूहाच्या चेअरमन पदावरून हकालपट्टी.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९६१ : बुकर विजेत्या भारतीय लेखिका अरुंधती रॉय यांचा जन्म.
१९५५ : इंग्लंडचा अष्टपैलू क्रिकेटपटू इयान बोथम यांचा जन्म.
१८७७ : भारतातील गुन्हे अन्वेषण शाखेचे (सीआयडी) कमिशनर कावसजी जमशेदजी पेटीगरा यांचा जन्म.
१८०६ : रग्बी फुटबॉलचे निर्माते विल्यम वेबल एलिस यांचा जन्म. (मृत्यू: २४ जानेवारी १८७२)
१६३२ : अँथनी व्हॉन लीवेनहॉक डच सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ (मृत्यू: २६ ऑगस्ट १७२३)
१७७५ : बहादूरशहा जफर दिल्लीचा शेवटचा बादशहा (मृत्यू: ७ नोव्हेंबर १८६२)
१८६८ : भवानराव श्रीनिवासराव तथा 'बाळासाहेब' पंतप्रतिनिधी औंध संस्थानचे अधिपती, चित्रकार, कीर्तनकार तसेच व्यायामविषयक पुस्तकांचे कर्ते (मृत्यू: १३ एप्रिल १९५१)
१८९४ : भारतीय लेखक, कवी आणि नाटककार विभुद्धभाषण मुखोपाध्याय यांचा जन्म. (मृत्यू: २९ जुलै १९८७)
१९१० : 'लीला' ऊर्फ माई भालजी पेंढारकर मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री (मृत्यू:)
१९११ : भारतीय स्वातंत्र्यसैनिक व प्रमुख समाजवादी नेता, अशोक मेहता यांचा जन्मदिन.
१९१४ : लक्ष्मी सहगल आझाद हिंद सेनेतील झाशी राणी रेजिमेंटच्या कॅप्टन (मृत्यू: २३ जुलै २०१२)
१९२१ : रासीपुरम कृष्णस्वामी तथा आर. के. लक्ष्मण व्यंगचित्रकार, पद्मभूषण (१९७१), रॅमन मॅगसेसे (१९८४), पद्मविभूषण (२००५) इत्यादि पुरस्कारांचे मानकरी (मृत्यू: २६ जानेवारी २०१५)
१९२६ : केदारनाथ सहानी सिक्कीमचे राज्यपाल, दिल्लीचे महापौर (मृत्यू: ३ आक्टोबर २०१२)
१९३५ : भारतीय पत्रकार आणि लेखक म्हणून मार्क टुली यांचा जन्म.
१९७२ : रीमा लांबा ऊर्फ 'मल्लिका शेरावत' अभिनेत्री व मॉडेल

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४८ : मदर्स डे च्या संस्थापिका ॲन्ना जर्व्हिस यांचे निधन. (जन्म: १ मे १८६४)
१६७५ : शिखांचे नववे गुरू गुरू तेग बहादूर यांचे निधन. (जन्म: १ एप्रिल १६२१)
१६०१ : टायको ब्राहे डच खगोलशास्त्रज्ञ, खगोलशास्त्रावर मूलभूत संशोधन केले. (जन्म: १४ डिसेंबर १५४६)
१९२२ : कॅडबरी चे संस्थापक जॉर्ज कॅडबरी यांचे निधन. (जन्म: १९ सप्टेंबर १८३९)
१९४४ : रेनॉल्ट कंपनी चे संस्थापक लुई रेनॉल्ट यांचे निधन. (जन्म: १२ फेब्रुवारी १८७७)
१९५४ : भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ते आणि समाजवादी राजकारणी रफी अहमद किदवई यांचे निधन.
१९७९ : अबारथ कंपनी चे संस्थापक कार्लो अबारट यांचे निधन. (जन्म: १५ नोव्हेंबर १९०८)
१९९२ : अरविंद गोखले मराठी नवकथेचे जनक, 'गंधवार्ता' या त्यांच्या कथेला आशियाई-अरबी-अफ्रिकी कथा स्पर्धेचे पहिले पारितोषिक मिळाले. भारतीय उपखंडातील प्रसिद्ध लेखकांच्या लघुकथांचा अभ्यास करण्यासाठी त्यांना १९८४ मधे केंद्र सरकारची फेलोशिप मिळाली होती. (जन्म: १९ फेब्रुवारी १९१९)
१९९५ : माधवराव साने पत्रकार, भारतीय श्रमिक पत्रकार संघटनेचे अध्यक्ष (जन्म:)
२०११ : लिस्प प्रोग्रॅमिंग लँग्वेज चे जनक जॉन मॅककार्थी यांचे निधन. (जन्म: ४ सप्टेंबर १९२७)
२०१३ : प्रबोधचंद्र तथा मन्ना डे पार्श्वगायक. 'सीमा', 'बरसात कीरात', 'दो बिघा जमीन', देख कबीरा रोया' आदी चित्रपटांतील त्यांची गाणी गाजली होती. (जन्म: १ मे १९१९)
२०१४ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते एस. एस. राजेंद्रन यांचे निधन

# युवाशक्ती गेवराईमध्ये परिवर्तन करेल-विजयसिंह पंडित

## विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत युवासंवाद मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

गेवराई । प्रतिनिधी

आजच्या या मेळाव्याला जमलेल्या युवा शक्ती समोर मी नतमस्तक होऊन सांगतो कि, शिवछत्र परीवार हा फक्त निवडणूक जवळ आली की नाटक करत नाही. तर आदरणीय दादा पासून रणवीर व पृथ्वीराज यांच्यापर्यंत आम्ही सर्व सदैव जनतेच्या सेवेसाठी तत्पर असतो. त्यामुळे तळ्यात - मळ्यात असलेल्या विरोधकांचा विचार न करता या युवाशक्ती च्या जोरावर आपण विजय खेचून आणू, युवा शक्ती गेवराई मध्ये परिवर्तन करेल असे प्रतिपादन विजयसिंह पंडित यांनी केले. ते राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने आयोजीत युवा संवाद मेळाव्यात उपस्थित युवकांशी संवाद साधत होते. यावेळी युवा नेते रणवीर पंडित, पृथ्वीराज पंडित यांच्यासह राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.



पुढे बोलताना ते म्हणाले की, आपल्या विरोधकांचे तळ्यात - मळ्यात असताना आपली गाडी विधानभवनाकडे निघाली आहे. आपला विजय निश्चित आहे. तुम्ही मला केव्हा ही फोन लावा मी सदैव उपलब्ध असणार आहे. अशावेळी तुम्ही सर्व तरुणांनी स्वतः उमेदवार आहेत असे समजून मतदार संघातील प्रत्येक कुटुंबा पर्यंत पोहचले पाहिजे. यावेळी रणवीर पंडित म्हणाले की, आज तालुक्यातील सहकारी साखर कारखाना, विविध शिक्षण संस्था, जायकवाडी चा उजवा कालवा व विविध स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या माध्यमातून शिवछत्र परीवाराचे कार्य प्रत्येक घरापर्यंत पोहोचलेले आहे. या परीवाराने हजारो कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. तुम्ही सर्व यांचे साक्षीदार आहात. त्यामुळे हे कार्य अखंडपणे चालू ठेवण्यासाठी विजयसिंह पंडित यांना विधानसभेत पाठवायचे आहे. पृथ्वीराज पंडित म्हणाले की, विरोधकांचा आणखीन काहीच ठाव - ठिकाणा नसून आपले काम मात्र जोरात चालू आहे. अमरसिंह पंडित आणि विजयसिंह पंडित यांनी हजारो लोकांची कामे मोफत केली आहेत. विजयसिंह पंडित यांचा वाढदिवस जरी २१ नोव्हेंबरला असला तरी तो २३ तारखेच्या विजयाने साजरा करुन त्यांना अनोखे असं गिफ्ट देण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. त्यामुळे सर्वांनी घरोघरी जाऊन प्रचार करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या मेळाव्याला राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सलिम शेख, धोंडराई च्या सरपंच शितलताई साखरे, अविनाश पवार, युवा नेते दत्ता वाघमारे, शिवाजी भोले, समीर सय्यद, मोहन नाना देवकाते, अशोक शिंदे, लहूजी साळवे बहुजन सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष दादासाहेब रोकडे, भटक्या विमुक्त सेलचे बाबासाहेब चव्हाण, अल्पसंख्यांक सेलचे तालुका उपाध्यक्ष नजीर भाई कुरेशी, संकेत कुलकर्णी, बळीराज शेळके, अशोक शिंदे, सरपंच शाहेद भैय्या पटेल यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर मदन भुसारे, अक्षय पवार, जयसिंह माने, अविनाश धस, विनोद मते पाटिल, माऊली गोरे, विजय चांदणे, रवी मरकड, रवी शिर्के, माऊली तळेकर, राजेश रसाळ, सुभाष काळे, राहून बांगर, राहून चव्हाण, युवराज जाधव, महेश तात्या, कपील अडागळे, अक्षय खरात यांच्या सह तालुक्यातील हजारो युवक उपस्थित होते.

विजयसिंह पंडित सभागृहात येण्यापूर्वी रणवी पंडित व पृथ्वीराज पंडित यांनी उपस्थितांना संबोधित केले. उपस्थित युवकांनी विजयसिंह पंडित यांच्या आगमनानंतर संपूर्ण सभागृह 'हमारा आमदार कैसा हो, विजयराजे जैसा हो', 'कोण म्हणतोय येत नाही, आल्याशिवाय राहत नाही.' अशा घोषणांनी दुमदुमून गेले. युवकांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. यावेळी रामपूरी येथील युवा नेते संजय तांगडे, गणेश पोटफोडे, अभिषेक अंभोरे, अक्षय पराड, अतिश खरात, कृष्णा पराड, युवराज भिसे व श्रीपतअंतरवाला येथील माजी ग्रामपंचायत सदस्य गोपीनाथ कचरे, बंडू कचरे, शहापूर मांजरा चे अशोक फरताडे यांनी विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला.

## थोडक्यात



### न्याय विभागाच्या प्रदेश सरचिटणीसपदी ॲड.सिद्धार्थ शिंदे यांची निवड

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार सामाजिक न्याय विभागाचे महाराष्ट्राचे प्रभारी तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष भीमराव हत्ती हंबीरे यांनी काल दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी बीड येथील ॲड.सिद्धार्थ शिंदे यांना सामाजिक न्याय विभागाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदावर नियुक्त केल्याची पत्र दिले आहे.

ॲड. सिद्धार्थ शिंदे यांच्या निवडीबद्दल खा. बजरंग बाप्पा सोनवणे, बीडचे आ.संदीप क्षीरसागर ज्येष्ठ विधिज्ञ बाळासाहेब कोल्हे, माजी आमदार उषाताई ठोंबरे, हेमा पिंपळे, भाकपचे ॲड. भीमराव चव्हाण, काँग्रेसचे ॲड.राहुल साळवे, ॲड.रोहिदास येवले, ॲड.प्रशांत राजापूरकर, ॲड.विलास जोशी, ॲड.वसंत वडमारे, ॲड. धीरज कांबळे, ॲड.नितीन वाघमारे, ॲड.दीपक तांगडे, ॲड. हेमंत आवटे, ॲड.आर.डी. गायकवाड, ॲड. गोरख खेडकर, ॲड.रामदास सानप, ॲड.फिडेल चव्हाण ॲड.संगीता वीर , ॲड.विद्या गायकवाड, ॲड.छाया वाघमारे, ॲड.भीमा जगताप, ॲड.अक्षय मुळे, ॲड. अभिजीत कदम सर्व मित्रमंडळीने अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

### ज्ञानसागरचा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात

बीड । प्रतिनिधी

शहरातील ज्ञानसागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी बीड येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी मुलांनी विविध देशभक्तीपर गीते, कोळीगीते, शेतकरी आत्महत्या, बेटी बचाव, शिवराज्याभिषेक, सर्व धर्म समभाव, आई-वडिलांचे महत्त्व, पोवाडा गायन, नाटिका, नृत्याविष्कार सादर केले. या कार्यक्रमास परीक्षक म्हणून कांता दोडके व मोहन घोडके यांनी काम पाहिले. आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष विजय विद्यागर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून मंदाकिनी आहिरे होत्या. अध्यक्षस्थानावरून आपले मनोगत व्यक्त करताना विजय वाघमारे म्हणाले की, विद्यार्थी जीवनात सांस्कृतिक कार्यक्रमाचे अनन्य साधारण महत्त्व आहे. विद्यार्थ्यांचे कलागुण जोपासण्याचे व वाढवण्याचे काम अशा सांस्कृतिक कार्यक्रमातून केले जाते. अशा कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कलेचा वारसा जपून स्वतःचे कौशल्य विकसित करावे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या कुलकर्णी व राजेंद्र चांदे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशाल देशमुख, अमन शेख, संतोष बागलाने, संतोष बोराटे, रामदास काकडे यांनी परिश्रम घेतले. मोठ्या उत्साहात हा कार्यक्रम संपन्न झाला.




## आष्टी वकील संघाच्या अध्यक्षपदी अजय जेवे विजयी

आष्टी। प्रतिनिधी



आष्टी वकील संघाच्या अध्यक्षपदासाठी चुरशीने झालेल्या निवडणुकीत अजय नाना जेवे हे ७५ मते घेऊन विजयी झाले, तर उपाध्यक्षपदी किशोर कल्याण निकाळजे, सचिवपदी यासीर ताहेर सय्यद, कोषाध्यक्षपदी संदीप रावसाहेब जगताप व महिला प्रतिनिधीपदी अर्चना चंद्रशेखर पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे.

आष्टी वकील संघाची निवडणूक जाहीर झाल्यानंतर उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या मुदतीपर्यंत ज्येष्ठ मंडळींच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व महिला प्रतिनिधी यांची बिनविरोध निवड दि.१७ ऑक्टोबर रोजी करण्यात आली होती. अध्यक्षपदासाठी अजय नाना जेवे, बाळासाहेब महादेव झांबरे व संभाजी मोहन दहातोंडे हे तीन उमेदवार रिंगणात होते. आज (ता. २२) मतदान पार पडून १४७ पैकी एकूण १४४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानानंतर सायंकाळी पाच वाजता मतमोजणी झाली. त्यात अजय जेवे यांना ७५ मते मिळून ते विजयी झाले. बाळासाहेब झांबरे यांना ४५, तर संभाजी दहातोंडे यांना २४ मते मिळाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. एम. एस. झांजे व ॲड. बापूराव गर्जे यांनी काम पाहिले.

## प्रा.डॉ.आप्पासाहेब टाळके यांना राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

आष्टी। प्रतिनिधी

येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या भगवान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आप्पासाहेब टाळके यांना 'महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषद, महाराष्ट्रच्या वतीने देण्यात येणारा २०२४ या वर्षासाठीचा 'राष्ट्रीय शिक्षकरत्न' पुरस्कार नुकता जाहीर झाला आहे. परिषदेचे प्रदेशाध्यक्ष व्यंकटराव जाधव यांनी नांदेड येथे २०२४ च्या इतर पुरस्कारांबरोबरच या पुरस्काराची ही घोषणा केली. महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषद महाराष्ट्रासह देशातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय असे पुरस्कार गेल्या १३ वर्षापासून देत आहे. प्रत्येक वर्षी राज्यस्तरीय शिक्षक परिषदेचे आयोजन करून मान्यवरांच्या हस्ते या पुरस्काराचे सन्मानपूर्वक वितरण करण्यात येते. यावर्षी १४ व्या राज्यस्तरीय शिक्षक परिषदेचे आयोजन महाकवी कालिदास कला मंदिर, नाशिक या ठिकाणी करण्यात आलेले असून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर (मध्य प्रदेश) व राष्ट्रीय सैनिक फेडरेशनचे अध्यक्ष माजी खासदार ब्रिगेडियर सुधीर सावंत या मान्यवरांच्या हस्ते शुक्रवार दिनांक ८ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

यावर्षीच्या शिक्षकरत्न या राष्ट्रीय पुरस्काराचे मानकरी ठरलेले डॉ.आप्पासाहेब टाळके हे १९९१ पासून म्हणजेच महाविद्यालयाच्या स्थापनेपासून हिंदी विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. तसेच त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू कनिष्ठ महाविद्यालय, आष्टी व अध्यापक महाविद्यालय, आष्टी येथेही आपली सेवा दिलेली आहे. भगवान वरिष्ठ महाविद्यालयामध्ये सेवा करत असताना त्यांनी आतापर्यंत ६०हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सेमिनार मध्ये सक्रिय सहभाग नोंदवला आहे. २३ राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये त्यांचे शोध निबंध प्रकाशित झालेले आहेत. तसेच ७ बुक चाप्टर आणि ३ स्वतंत्र पुस्तकेही प्रकाशित झालेली आहेत. त्याचबरोबर विद्यापीठ अनुदान आयोगाचा एक रिसर्च प्रोजेक्ट ही त्यांनी पूर्ण केलेला आहे. या शैक्षणिक कार्याबरोबरच त्यांनी अनेक विद्यार्थीकेंद्री आणि समाज उपयोगी कार्यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतलेला आहे. सन २००१ ते २००५ या कालावधीमध्ये महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी म्हणून तसेच सन २०१३ ते २०१८ या कालावधीमध्ये महाविद्यालयातील आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाचे कार्यक्रमाधिकारी म्हणून ग्रामीण भागामध्ये विद्यार्थ्यांच्या मदतीने अनेक उपक्रम राबवून आपल्या समाजाभिमुख कार्याची छाप पाडली. ५ वर्षे महाराष्ट्र हिंदी परिषदेचे कार्यकारणी सदस्य, ३ वर्ष जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद बीड जिल्हा उपाध्यक्ष, महाविद्यालयाचा वार्षिक अंक 'गंगाई- बाबाजी' चे सह-संपादक, महाविद्यालयाचे प्रसिद्ध विभाग प्रमुख; या विविध क्षेत्रांमध्ये केलेले उल्लेखनीय कार्य आणि सध्या महाविद्यालयाचे उपप्राचार्य म्हणून सांभाळत असलेले प्रशासनिक जबाबदारी- या सर्व कार्याची दखल घेऊन महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषदेने त्यांना यावर्षीचा राष्ट्रीय शिक्षक रत्न पुरस्कार जाहीर केला आहे. त्याबद्दल समाजातील सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक- अध्यक्ष, शिक्षणमहर्षी, माजी आमदार भीमराव धोंडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य व संस्थेचे सहसचिव युवा नेते डॉ.अजय दादा धोंडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, उपप्राचार्य डॉ. ज्ञानदेव वैद्य, आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, उपप्राचार्य प्रो. भास्कर चव्हाण, डॉ. बापू खैरे, डॉ. दत्ता पाटील नरसाळे, एडवोकेट बी.डी. हंबर्डे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपान निंबोरे, उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब मुटकुळे व भगवान महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



## सिद्धेश्वर हजारे, पूर्वा लांडे यांचा सत्कार सोहळा



माजलगाव । प्रतिनिधी

येथील भावसार समाजाचे सिध्देश्वर हजारे यांची बीड जिल्हा कृषी अधिकारी पदी नियुक्ती झाली असून भावसार समाजाच्या पूर्वा रामेश्वर लांडे हिने वैद्यकीय पूर्व परीक्षा नीट प्रवेश पात्रता परीक्षेमध्ये यश मिळवत मेडिकल कॉलेज परभणी येथे प्रवेश मिळवला आहे. त्यामुळे भावसार समाजाच्या वतीने दि.२२ ऑक्टोबर रोजी भावसार सभागृह येथे त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला व त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या या सत्कार समारंभ कार्यक्रमासाठी साठी भावसार समाजाचे बीड जिल्हा अध्यक्ष प्रकाश कांनगावकर प्रमुख उपस्थिती होती तर या कार्यक्रमासाठी महेश सदरे,विक्रम गार्डी व माजलगाव समाज अध्यक्ष प्रदीप भावसार,चंद्रकांत बुलबुले,दत्ता गर्जे, सतीश गरुड, रामेश्वर लांडे,डिगांबर गरुड,श्रीराम कळसकर , दत्तात्रय गरुड,राजेश भावसार, रामेश्वर कुटे, संतोष लोखंडे,गजानन खोले,सदाशिव कळसकर, सखाराम पतंगे. यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मीकांत भावसार यांनी केले तर आभार प्रदर्शन पत्रकार निलेश गरुड यांनी मानले या वेळी मोठ्या संख्येने महिला मंडळ व समाज बांधव उपस्थित होते.

## अर्जुनराव खोतकर यांना आठव्यांदा शिंदे शिवसेनेची उमेदवारी

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे येणे जालना विधानसभेचे शिवसेना उमेदवारी माजी राज्यमंत्रीअर्जुनराव खोतकर यांना उमेदवारी जाहीर केली असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले यावेळी मुंबई येथे ए बी फार्म दिल्याबद्दल व मुख्यमंत्र्याचे आभार मानण्यात आले. बदनापूर विधानसभा शिवसेनेचे वतीने अकोला निकाल येथील समृद्धी महामार्गावर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी व अकोला निकळक भराडखेडा कंडारी रामखेडा बदनापूर येथील ग्रामस्थांनी सत्कार केला याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख पंडित दादा भुतेकर युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे शहर प्रमुख विष्णू पाच फुले उपजिल्हाप्रमुख गणेश दादा सोपारकर नगरसेवक राहुल हिवराळे मेघराज भैय्या चौधरी अल्पसंख्यांक शहर प्रमुख जफर भाई युवा सेना तालुकाप्रमुख ईश्वर पाटील झुंबड अकोल्याचे सरपंच उपतालुकाप्रमुख महादू गीते युवा सेना शहर संघटक अमोल दाभाडे शहर प्रमुख कैलास खैरे सोशल मीडिया तालुकाप्रमुख देवा ढाकणे सरपंच विलास सावंत कंडारी सरपंच भरत खाडे रामेश्वर दराडे भगवानराव ढाकणे कैलास पालवे अण्णासाहेब तांबे समाधान मुंडे शरद गीते निवृत्ती राजे दत्ता तांबे कृष्णा ढाकणे ज्ञानेश्वर दराडे बालाजी शिंदे यांच्या सह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती



## फुलचंद कराड यांच्या उमेदवारीसाठी शिष्टमंडळ शरद पवारांना भेटले

### परळी मतदार संघातुन उमेदवारीचे दिले संकेत

परळी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंदराव कराड यांच्या परळी विधानसभा मतदारसंघातील उमेदवारीसाठी परळी मतदारसंघातील शिष्टमंडळाने आज दिनांक २२ ऑक्टोबर रोजी मुंबई येथे शरदचंद्र पवार व खा.सुप्रियाताई सुळे यांची भेट घेतली यावेळी यावेळी शरद पवार यांनी फुलचंद कराड हे परळी मतदारसंघासाठी अनुभवी उमेदवार असल्याचे सांगत उमेदवारीचे संकेत दिले.



परळी विधानसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाकडून उमेदवारी देण्यासाठी मोठ्या हालचाली सुरू आहेत या संदर्भात परळी विधानसभा मतदारसंघात मागील ३५ वर्षापासून सक्रिय असलेले फुलचंद राव कराड यांनी निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर परळी मतदारसंघातून कराड यांनाच उमेदवारी द्यावी यासाठी एका शिष्टमंडळाने मंगळवार दिनांक २२ ऑक्टोबर रोजी वाय बी सेंटर मुंबई येथे दुपारी दोन वाजता राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांची भेट घेत कराड यांना उमेदवारी जाहीर करण्याची मागणी केली यावेळी शिष्टमंडळासोबत झालेल्या चर्चेत कराड यांनी यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसकडून परळी विधानसभा निवडणुक लढवत ६५ हजार मते घेतली होती.१९८० ते २०१९ पर्यंत जिल्हा परिषद,नगरपालिका,विधानसभा व लोकसभा निवडणुकीत प्रचारप्रमुख म्हणुन परळी विधानसभा मतदार संघाची धुरा सांभाळलेली असल्याने माझी पक्षाची फुलचंद कराड यांनाच पसंती आहे.कराड हेच धनंजय मुंडे यांना आव्हान देऊन परळी विधानसभा मतदार संघावर राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा फडकावु शकतात असे सांगत फुलचंद कराड यांच्या उमेदवारीचे संकेत दिले. फुलचंद कराड व शरदचंद्र पवार यांच्या भेटीमुळे परळी मतदारसंघात नवचैतन्य पसरले असून राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व जेष्ठ कार्यकर्ते तसेच कराड यांच्यासोबत काम केलेल्या अनेक कार्यकर्त्यांमध्ये या भेटीमुळे मोठी उत्सुकता निर्माण झाली

# बीड नगरपालिकेने भ्रष्टाचाराचा कळस गाठला

## बांधकाम परवान्यासाठी कनिष्ठ अभियंता अखिल फारोकी याला नऊ लाखाची लाच घेताना पकडले

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिका गेल्या अनेक दिवसांपासून भ्रष्टाचार प्रकरणात चर्चेत आहे. या ठिकाणी कोणी किती खावे याला पायपोस राहिला नाही. बांधकाम परवान्यासाठी तब्बल १२ लाखाची लाच कनिष्ठ अभियंता अखिल फारोकी अहेमद यांनी मागितली. तडजोडीने नऊ लाख रुपये घेण्याचे ठरवण्यात आले. हे पैसे खासगी इसम किशोर खुरमुरे यांच्याकडे देण्याचे ठरले होते. हे पैसे घेताना तसेच अभियंत्याला लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने बुधवारी ताब्यात घेतले. या प्रकरणामुळे नगरपालिका पुन्हा चर्चेत आली असून भ्रष्टाचाराने याठिकाणी




कळस गाठला आहे. यावरून मुख्याधिकारी निता अंधारे यांच्या कामकाजावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पिंपळनेर पोलीस ठाण्यातील रामप्रसाद शिवनाथ कडूळे (वय-३६,पोलीस अंमलदार) व ईश्वर बाबासाहेब जामकर (वय-४४ होमगार्ड) या दोघांवर वाळूचा टॅक्टर चालू देण्यासाठी व बीड नगरपालिकेतील तक्रारदार यांचे वडील व त्यांचे शेजारी यांचे बांधकाम परवाना काढण्यासाठी ९ लाखांच्या लाच प्रकरणात कनिष्ठ अभियंता व खाजगी इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.एकाच दिवशी बीड व जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईत चार जणांवर गुन्हे दाखल करण्यात आल्यामुळे खळबळ उडाली आहे.

पिंपळनेर पोलीस ठाण्यातील रामप्रसाद शिवनाथ कडूळे (अंमलदार) व होमगार्ड ईश्वर बाबासाहेब जामकर या दोघांवर पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.वाळूचा टॅक्टर चालू देण्यासाठी ५ हजारांच्या लाच प्रकरणात हे गुन्हे दाखल करण्यात आले.होमगार्डला ताब्यात घेण्यात आले असून रामप्रसाद कडूळे फरार आहे.जालन्याच्या पथकाने बीडमध्ये येऊन ही कारवाई केली.तर दुसरीकडे बीडच्या नगरपालिकेतील कनिष्ठ अभियंता फारुकी अखिल आहेमद वकील आहेमद याने बांधकाम परवान्यासाठी बारा लाखांच्या लाचेची मागणी करून तडजोडी अंती ९ लाख तक्रारदार यांना खाजगी इसम किशोर खुरमुरे यांचेकडे देण्यास सांगून प्रोत्साहन दिले.म्हणून दोन्ही आरोपींना एसीबीने ताब्यात घेतले आहे. बीड शहर पोलीस ठाण्यात सध्या गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू असून लाचलुचपत विभागाच्या करवाईमुळं चार जणांवर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत.एकाच दिवशी पोलीस आणि नगरपालिकेतील लाचखोरांवर कारवाई झाल्यामुळे बीडमध्ये मात्र अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले होते.

# मोंढा रस्त्याची एक बाजू पूर्ण

## काम दर्जेदार होण्यासाठी जातीने लक्ष -नाईकवाडे

**बीड । प्रतिनिधी**

जालना रोड येथून मोंढा कडे जाणाऱ्या रस्त्याची एक बाजू पूर्ण झाली असून हे काम दर्जेदार होण्यासाठी अमर नाईकवाडे आणि फारुख पटेल हे जातीने लक्ष घालत आहेत अनेक दिवसापासून मोंढा रस्त्याचे काम रखडले होते त्यामुळे या रस्त्याची चाळणी झाली होती याशिवाय काही दिवसापूर्वी पुलावरील रस्ताही उखडून ठेवला होता त्यामुळे पोलालाही धोका निर्माण झाला होता ही सर्व कामे राजकीय कुरघोडी मध्ये रखडल्याने हे काम होत नव्हते मात्र आता हे काम प्रगतीपथावर असून मोंढा ते जालना रोड या रस्त्याची एक बाजू पूर्ण झाली आहे.

हे काम दर्जेदार होत असल्याचे माजी नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी सांगितले .उर्वरित



एक बाजू ही लवकरच पूर्ण करण्यात येणार असून हा रस्ता दर्जेदार होण्यासाठी नगरपालिकेचे गटनेते आरोप पटेल आणि नगरसेवक अमर नाईकवाडे हे दोघे प्रयत्नशील असल्याचे असल्याने हा राष्ट्राचा दर्जेदार होईल असा विश्वास अहमदनगर यांनी व्यक्त केला आहे.

# दोन दिवसात २०७ उमेदवारी अर्जाची विक्री

**बीड । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूकीच्या प्रक्रियेला आजपासून प्रत्यक्ष सुरूवात झाली आहे. मंगळवार दि.२२ पासून उमेदवारी अर्ज विक्रीस सुरूवात झाली असुन दुपारपर्यंत बीड विधानसभा मतदार संघासाठी पहिल्या दिवशी ५३ अर्जाची विक्री झाली होती.तर बुधवारी १५४ अर्जाची विक्री झाली आहे.

मंगळवारपासून नामनिर्देशन अर्जाची विक्री आणि दाखल करण्यास सुरूवात झाली असुन दि.२९ ऑक्टोबर पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. बीड तहसील प्रशासन अर्ज विक्रीसाठी सज्ज झाले असुन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत अर्ज विक्रीचे टेबल लावण्यात आले असुन आवश्यक त्या टेबलवर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पहिल्या दिवशी ५३ जणांनी नामनिर्देशन पत्राची खरेदी केली असून बुधवारी १५४ अर्जाची विक्री झाली आहे. दोन दिवसात बीड विधान सभा मतदार संघासाठी २०७ अर्जाची विक्री झाली असल्याची माहिती तहसील प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

# पालकमंत्र्यांच्या मतदारसंघात कर्मचाऱ्यांची दिवाळी अंधारात -राजेभाऊ फड

परळी । प्रतिनिधी

परळी विधानसभा मतदारसंघातील मौजे सिरसाळा ही सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे. या ग्रामपंचायत कार्यालयात काम करणाऱ्या कष्टकरी कर्मचाऱ्यांचे रुपये २८ लक्ष ०६ हजार ४०० रुपयांचे वेतन गेल्या अनेक महिन्यांपासून थकीत आहे. सणासुदीचे दिवस असल्याने थकीत वेतन देण्यात यावे या मागणीसाठी कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा मार्ग पत्करला असून २४ दिवस धरणे आंदोलन करूनही ग्रामपंचायत प्रशासनाने अथवा जिल्हा परिषदेने यावर काहीही तोडगा काढला नाही. आज बुधवारी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्या आंदोलनाला




**सिरसाळा ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला दिली भेट; प्रश्न मिटेपर्यंत पाठीशी राहण्याचे दिले आश्वासन**

पाठिंबा दिला. कर्मचाऱ्यांच्या न्याय आणि हक्कासाठी आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने त्यांच्या खंबीरपणे पाठीशी आहोत असे आश्वासन युवक नेते राजेभाऊ फड यांनी दिले.

सिरसाळा ग्रामपंचायत कर्मचारी मागील २४ दिवसांपासून थकीत वेतन देण्यात यावे या मागणीसाठी धरणे आंदोलन करीत आहेत. आंदोलनाला २३ दिवस होऊनही प्रशासनाने दखल न घेतल्याने दि.२३ पासून आंदोलकांनी अमरण उपोषण सुरू केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी बुधवारी आंदोलकांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बाबा शिंदे, ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष एच.यू.फड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. तद्नंतर पत्रकारांशी संवाद साधत असताना ते म्हणाले की, बीड जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या कृपाशीर्वादाने परळी मतदारसंघात आणि बीड जिल्ह्यात सर्वात गैरकारभार

◀◀ पान ३ वर

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश सचिवपदी रेश्मा जगताप

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष जयंत पाटील यांच्या मान्यतेने मुंबई येथे खा सुप्रिया सुळे यांच्या हस्ते रेश्मा जगताप यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश सचिवपदी नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली. आष्टी तालुक्यातील मूळ पाटण सांगवी येथील रहिवासी सध्या पनवेल व अहमदनगर येथे सामाजिक क्षेत्रात



उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तथा नागरिक व महिलांच्या प्रश्नांवर सतत आवाज उठवणा-या अडीअडचणीत साथ देणा-या रेश्मा जगताप यांची ओळख असून त्यांच्या उत्कृष्ट कार्याची व कामांची दखल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष जयंत पाटील व खा सुप्रिया सुळे यांनी घेतली असून त्यांची मुंबई येथे दि.२० ऑक्टोबर रोजी पक्षाच्या सर्वेसर्वा नेत्या खा सुप्रिया सुळे यांनी नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली आहे. आपण देशाचे नेते शरदचंद्र पवार व प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील ,खा सुप्रिया सुळे यांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहचवून पक्ष संघटन मजबुत व बळकट करण्यासाठी महिलांचे व विविध घटकांतील नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे नवनियुक्त प्रदेश सचिव रेश्मा जगताप यांनी बोलताना सांगितले. त्यांच्या निवडीबद्दल राजकीय,सामाजिक, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# परतुर मतदारसंघात १ लाख १०७२० लाडक्या बहिणीच्या खात्यात ८० कोटी जमा - आ. लोणीकर



**जालना । प्रतिनिधी**

परतुर विधानसभा मतदारसंघ हा बागायती पट्टा असल्याने परतूर विधानसभा मतदारसंघातील मंठा परतूर व जालना तालुक्यातील नेर सेवली सर्कल मधील अनेक शेतकऱ्यांच्या विजेच्या बाबतीत अनेक तक्रारी शेतकऱ्यांनी माझ्या कडे केल्या होत्या. याच अनुषंगाने आपण अनेकदा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या कडे मी केलेल्या पाठपुराव्याला यश आल्याने आर डी एस एस योजनेतुन परतूर विधानसभा मतदार संघात मंठा तालुक्यातील पेवा येथे ३३/११ के व्ही नवीन सब स्टेशन मंजूर झाले असून नेर विडोळी तळणी लोणी श्रीष्टी आणी सेवली या सहा ठिकाणी येथे पाच पावर क्षमतेचे एम व्ही ए ट्रान्सफार्मर मंजूर झाले आहे. यामुळे परतुर विधानसभा मतदारसंघातील मंठा परतूर व जालना तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतीला २४ तास वीज उपलब्ध होणार असून गावागावातील खेड्यापाड्यातील तांडे वाड्या वस्तीवर २४ तास वीज उपलब्ध असेल. आर डी एस एस योजने अंतर्गत विजेचे पोल व नवीन डिप्या उभारणी करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या आर डी एस एस योजने करिता महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री

◀◀ पान ३ वर

# अनुवंशिक बदलातील परीमान शोधणारे जीवरासायनिक विश्लेषक यंत्र

## डॉ नवनाथ काशीद यांना युकेचे पेटेंट

केज । प्रतिनिधी

श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस संचलित, बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज, येथील वनस्पतीशास्त्र विषयातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. नवनाथ काशीद, यांच्या नावीन्यपूर्ण अशा अनुवंशिक बदलातील परिमाण शोधणारे जीव रासायनिक विश्लेषक यंत्र या नवनिर्मित उपकरणास युनायटेड किंग्डम कडून पेटंटच्या माध्यमातून मान्यता देण्यात आलेली आहे. डॉ.नवनाथ काशीद व त्यांचे सहकारी यांच्या संयुक्त उपक्रमातून प्राणी व



वनस्पती मधील घडून येणार अनुवंशिक बदल, त्याचे परिमाण शोधण्यासाठी जीव रासायनिक विश्लेषक यंत्र याची निर्मिती केली आहे. या यंत्राच्या उपयोगाने संशोधक विद्यार्थी, प्रयोगशाळा मध्ये कार्यरत असणारे अध्ययनार्थी यांना हे सर्व बदल एकच

◀◀ पान ३ वर

# खोलेश्वर माहाविद्यालयाच्या क्रिडा विभागाचे विद्यापिठीय स्पर्धेमध्ये नेत्रदिपक यश

अंबाजोगाई प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ . संभाजीनगर व बलभिम महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत आंतरमहाविद्यालयीन टेबल टेनिस पुरुष व महिला या स्पर्धेमध्ये खोलेश्वर महाविद्यालयातील ( पुरुष व महिला ) संघाला तृतिय पारितोषिक प्राप्त झाले. या खेळामध्ये पारितोषक प्राप्त करणारे विद्यार्थी कु योगेश्वरी कुलकर्णी , चि . योगेश कोळी , चि . महेश धायगुडे , चि . प्रतिक रोडे हे तृतीय पारितोषिकाचे मानकरी ठरले . तसेच १८ ऑक्टो २०२४ रोजी डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ . संभाजीनगर जे .एस . कॉलेज जालना यांचा संयुक्त विद्यमाने आयोजीत सेंट्रल झोन टेबल टेनिस पुरुष व महिला स्पर्धेमध्ये महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. योगश्वरी कुलकर्णी (बी .एस्सी प्रथम वर्ष ) हिने टेबल टेनिस महिला या प्रकारामध्ये प्रथम पारितोषिक प्राप्त केले व विद्यापीठ कॅम्पसाठी तीची निवड झाली . तसेच दि १९ ऑक्टो २०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर येथील क्रिडा संकूल येथे झालेल्या सेन्ट्रल झोन मैदानी स्पर्धेमध्ये खोलेश्वर महाविद्यालयातील खेळाडू कु. राजनंदिनी केंद्रे हिने ११० मिटर अडथळा स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला तसेच चि.पवन ईटेकर याने ४००



◀◀ पान ३ वर

# मी चक्रव्यूहात सापडेल तो अभिमन्यू नाही, मी धनंजय आहे आणि माझ्या पाठीशी माझी जनता आहे -धनंजय मुंडे

बीड । प्रतिनिधी

मागील वर्षभरापासून अनेक मोठे लोक माझ्या मागे लागले असून माझे राजकीय अस्तित्व संपवण्यासाठी अभिमन्यू प्रमाणे मला चक्रव्यूहामध्ये गाठण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र अर्जुनाचेच दुसरे नाव असलेला मी धनंजय आहे; मी चक्रव्यूहात सापडणार नाही, माझ्या पाठीशी माझ्या जनतेचा आशीर्वाद आहे. जोपर्यंत माझ्या जनतेचा आशीर्वाद आणि प्रेम माझ्या पाठीशी आहे तोपर्यंत माझा अभिमन्यू कोणीही करू शकत नाही असे उद्गार आज कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी बोलताना काढले आहेत.

परळी विधानसभा मतदारसंघात सह बीड जिल्ह्यातील विविध भागातील शिक्षण, नोकरी, व्यवसाय आदी



**छत्रपती संभाजीनगर मधील परळीकरांशी धनंजय मुंडे यांनी साधला मनमोकळा संवाद**



## मोठ्या शहरात राहणाऱ्या माझ्या लोकांची मदत करू शकतो, हे माझे भाग्य - धनंजय मुंडे

कामानिमित्त छत्रपती संभाजी नगर व परिसरात राहणाऱ्या नागरिकांशी व विद्यार्थ्यांशी आज धनंजय मुंडे यांनी छत्रपती संभाजी नगर शहरातील लेमन ट्री हॉटेलमध्ये आयोजित कौटुंबिक स्नेह मेळाव्याच्या निमित्ताने संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते.

मोठ्या शहरात विविध कामानिमित्त राहणारे विद्यार्थी व नागरिक आणि अडचणीच्या व संकटाच्या काळी मला हक्काने फोन करतात. त्यांच्या मदतीला मी तत्परतेने धावून जाण्याचा प्रयत्न करतो. परंतु अडीअडचणीच्या व संकटाच्या काळी आपल्याला मदत करेल म्हणून धनंजय वर तुमचा जो विश्वास आहे, ते माझे भाग्य आहे आणि तो

◀◀ पान ३ वर

# गेवराई विधानसभेच्या आखाड्यात मयुरी मस्के मनसेच्या उमेदवार



## राज ठाकरे यांच्याकडून सामाजिक कार्याची दखल घेऊन उमेदवारी जाहीर

## पंडित-पवारांना मयुरीताई मस्के ठरणार तगड्या उमेदवार

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यात मयुरीताई मस्के-खेडकर व बाळासाहेब मस्के यांनी समाजसेवेतून एक वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. दरम्यान ते करत असलेल्या सामाजिक कार्याची दखल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांनी घेऊन गेवराई विधानसभेची उमेदवारी मयुरी मस्के यांना जाहीर केली आहे. मंगळवारी रात्री उशिरा मनसेने राज्यातील उमेदवारांची यादी जाहीर केली असून या पहिल्याच यादीत मयुरी मस्के यांचे नाव असून हि उमेदवारी जाहीर होताच कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

◀◀ पान ३ वर

### राजसाहेब ठाकरे यांचा विश्वास सार्थकी लावणार -मयुरीताई मस्के

मतदारसंघात मागील काही वर्षांत तन, मन, धनाने काम केले. गोरगरीबांच्या अडचणी तसेच त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने काम केले. दरम्यान या कार्याची दखल घेऊन राजसाहेब यांनी मला उमेदवारी देऊन विश्वास दाखवला. त्यामुळे राज साहेबांनी आमच्यावर दाखवलेला विश्वास सार्थकी लावणार. तसेच मतदारसंघातील शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी मार्गी लावण्यासाठी प्राधान्य देणार असून नवीन उद्योग आणण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तसेच महिलांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरोधात मी काम करणार आहे, असे मनसेच्या गेवराई विधानसभेच्या उमेदवार मयुरीताई मस्के यांनी सांगितले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# पुण्यात अपघातांची मालिका; वेगवेगळ्या घटनांमध्ये तिघांवर काळाचा घाला

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील कात्रज-कोंढवा रस्ता, येरवड्यातील चंद्रमा चौक आणि खराडीत झालेल्या वेगवेगळ्या तीन अपघातात तिघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. याप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहेत. कात्रज-कोंढवा रस्त्यावर भरधाव कारने दिलेल्या धडकेत भुजंग सुंदर शिंपले (रा. सनसिटी, सिंहगड रस्ता) या दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला. तर, दुचाकीवरील सहप्रवासी संकेत गुरव (वय १६) जखमी झाला असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी कार चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत भुजंगचा भाऊ समाधान शिंपले (वय २१) याने तक्रार दिली आहे.

सोमवारी रात्री बाराच्या सुमारास दुचाकीस्वार भुजंग आणि त्याचा मित्र संकेत कात्रज-कोंढवा रस्त्याने जात होते. तेव्हा कात्रज स्मशानभुमीजवळ



पाठिमागून आलेल्या कारने भुजंगच्या दुचाकीला जोराची धडक दिली. अपघातात दुचाकीस्वार भुजंग आणि त्याचा मित्र संकेत जखमी झाले. दोघांना तत्काळ रुग्णालयात दाखल केले. परंतु, गंभीर जखमी झालेने भुजंगचा उपचारांपूर्वीच मृत्यू झाला. अधिक तपास उपनिरीक्षक मोहन देशमुख करत आहेत.

येरवड्यातील चंद्रमा चौकात कारवर दुचाकी आदळून झालेल्या अपघातात दुचाकी चालकाचा मृत्यू झाला. संजय शिवाजी चौधरी (वय ५२, रा. सोरतापवाडी, उरळी कांचन) असे मृत्यू झालेल्याचे नाव आहे. याबाबत पोलीस उपनिरीक्षक शब्बीर शेख यांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. दुचाकीस्वार संजय येरवड्यातील चंद्रमा चौकातून जात होते. त्यावेळी त्यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले. नंतर दुचाकी कारवर आदळली. यात ते गंभीर झमी झाले होते. पोलीस उपनिरीक्षक चौधरी तपास करत आहेत.

नुकताच सफाई कामगार महिलेचा मृत्यू

फुटपाथवर गवत काढणाऱ्या सफाई कामगार महिलेचा भरधाव वाहनाच्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना घडली होती. मुंढवा-खराडी रस्त्यावर ही घटना घडली होती. याप्रकरणी पोलिसांनी मोटार चालकाला राजेंद्र ज्ञानोबा धुमाळ (वय ५२, रा. रायकर मळा, धायरी) याला अटक केली आहे. तर, छाया मंगेश पेढारकर (वय ३९, रा. खराडी) अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. पेंढारकर महापालिकेत कंत्राटी पदावर सफाई कर्मचारी म्हणून काम करत होत्या. सोमवारी सकाळी हा अपघात झाला आहे.

# मामा-पाटील तिसऱ्यांदा येणार आमनेसामने? इंदापूरमध्ये होणार कांटे की टक्कर

**इंदापूर | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. महायुतीच्या तिन्ही पक्षांनी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. भाजप, शिंदे गट आणि त्यानंतर आता अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाने देखील उमेदवार जाहीर केले आहेत. अजित पवार यांच्या पक्षाने पहिली यादी जाहीर करत ३८ उमेदवार जाहीर केले आहेत. यामध्ये अजित पवार बारामतीमधून निवडणूक लढणार आहेत. दरम्यान, अजित पवार यांनी इंदापूरमधून पुन्हा एकदा दत्तात्रय भरणे यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे इंदापूरमध्ये पुन्हा एकदा दत्तात्रय भरणे आणि हर्षवर्धन पाटील यांच्यात सामना होण्याची शक्यता आहे.

ज्या जागेवर ज्या पक्षाचा विद्यमान आमदार असेल त्या जागेवर त्या पक्षाचा उमेदवार असला एक फॉर्म्युला महायुतीने ठरवल्याचे सांजहते आहे. त्यानुसार इंदापूरची जागा ही राष्ट्रवादी काँग्रेसकडे जाणार होती. त्यामुळे आपल्याला महायुती तिकीट देणार नाही, यामुळे भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनी भाजपला रामराम ठोकला. त्यानंतर हर्षवर्धन पाटील यांनी हाती तुतारी घेतली आहे. तसेच शरद पवार आणि जयंत पाटील यांनी देखील हर्षवर्धन पाटील यांच्या उमेदवारीबाबत संकेत दिले आहेत. त्यामुळे हर्षवर्धन पाटील यांना शरद पवार गटाने तिकीट दिल्यास दत्तात्रय भरणे यांच्याविरुद्ध पुन्हा एकदा हर्षवर्धन पाटील हे उमेदवार असणार आहेत.



तसेच असे झाल्यास तिसऱ्यांदा दत्तात्रय भरणे आणि हर्षवर्धन पाटील हे निवडणुकीत आमने सामने येणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार यांच्या गटाच्या ३८ उमेदवारांची पहिली यादी जाहीर झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून अजित पवार आणि भाजपमध्ये जागावाटपांवरून तिढा वाढला होता. अजित पवार आणि मुख्यंत्री एकनाथ शिंदे दोन-तीनवेळा दिल्लीलाही जाऊन आले. त्यानंतर अखेर आज अजित पवार यांच्या गटाची पहिली यादी जाहीर झाली आहे.

# आठ वर्षे जीव लावला अन् फासावर लटकवलं; मुळशीतील त्या घटनेवर आदित्य ठाकरेही संतापले!

पुणे | प्रतिनिधी

पुण्याच्या मुळशी तालुक्यातील पिरंगुट परिसरात एका पाळीव श्वानाला त्याच्याच मालकाने झाडाला दोरी बांधून फासावर लटकवून ठार मारल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पौंड पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. पिरंगुटच्या निकटेवस्ती परिसरामध्ये वास्तव्यास असलेल्या जगताप कुटुंबीयांकडे हा लॅब्राडोर जातीचा श्वान गेल्या ७ ते ८ वर्षांपासून होता. काल श्वानाच्या मालकाने मिशन पॉसिबल फाउंडेशन या संस्थेच्या पद्मिनी पिटर स्टंप यांना संपर्क केला.

आम्हाला हा श्वान सांभाळायचा नाही, तुम्ही त्याला




घेऊन जा... असं जगताप यांनी सांगितलं. श्वानाला घेण्यासाठी रुग्णवाहिका पाठवत असल्याचं पद्मिनी यांनी सांगितलं. काही वेळाने पुन्हा मालकाने पद्मिनींना कॉल केला. तुम्ही येऊ नका मी माझ्या श्वानाला मारून टाकल्याचं सांगितलं. त्याचे फोटो सुद्धा त्यांनी पद्मिनींना पाठवले.

विकृत बुद्धीच्या या मालकाच्या कृतीनं पद्मिनी संतापल्या. त्यांनी या संदर्भात पौंड पोलिसात श्वान मालक आणि एका महिलेच्या विरोधात पाळीव प्राण्याची क्रूरतेने हत्या केल्याबद्दल तक्रार दिली.

घटनेचे गांभीर्य ओळखून पौंड पोलिसांनी श्वान मालक ओमकार जगताप आणि एका महिलेच्या विरोधात भारतीय न्याय संहिता ३२५ सह प्राणी क्रूरता अधिनियम कायदा १९६० च्या कलम ११ नुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात दोघांना अटक केली आहे. श्वानाला कोणताही आजार नव्हता, तरी मालकाने असं कृत्य का केलं याबाबतच तपास पौंड पोलीस करत आहे. दरम्यान हा सर्व प्रकार गंभीर असून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे युवा नेते आणि प्राणीप्रेमी आदित्य ठाकरे यांनी एक्स या सोशल मीडियावर पोस्ट करत या घटनेतील आरोपींवर पुणे ग्रामीण पोलिसांनी कठोर कारवाई करण्याची मागणी देखील केली आहे.

# सांगलीनंतर मावळ पॅटर्न, सुनिल शेळकेंचा पराभव करणे हेच आमचं लक्ष, भाजपच्या पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

लोकसभेवळी खासदार विशाल पाटलांसाठी राबवण्यात आलेला सांगली पॅटर्नची राज्यभर चर्चा झाली. आता असाच पॅटर्न मावळ (चर्रींरश्र झर्रींशीप) विधानसभेत राबवला जातोय. या मतदारसंघात मावळ पॅटर्नची जोरदार चर्चा सुरु आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने विद्यमान आमदार सुनील शेळकेंना (डींपळश्र डहशश्रज्ञश) उमेदवारी दिली आहे. त्यामुळं भाजपचे पदाधिकारी नारज झाले आहेत. सुनिल शेळकेंच्या पराभवासाठी बंडखोरी झाली आहे. बापू भेगडेंनी (इर्री इहशसरवश) तशी घोषणा देखील केली आहे. त्यानंतर काही वेळातच मावळ भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले अन बंडखोर बापू भेगडेंना पाठिंबा दर्शवलाय. राजीनामे देताना माजी राज्यमंत्री बाळा भेगडेंना अश्रू अनावर झाले.

सुनिल शेळकेंचा पराभव करणे हेच आमचं लक्ष

येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत सुनिल शेळकेंचा पराभव करणे हेच आमचं लक्ष असल्याचे बाळा भेगडे म्हणाले. मावळच्या जनतेच्या आशिर्वादावर बापू भेगडे यांना निवडूण आणणार असल्याचे



बाळा भेगडे म्हणाले. योग्य वेळी योग्य प्रयोग करायचा असतो असे बाळा भेगडे म्हणाले. त्यामुळं मी यावेळी उभा राहणार नाही. आम्ही बापू भेगडे यांना पाठिंबा दिला आहे. मावळ विधानसभा मतदारसंघात भाजप टिकला पाहिजे हीच आमची भूमिका आहे. पाच वर्ष आम्ही खूप भोगलं आहे असे बाळा भेगडे म्हणाले. आज आमचं लक्ष बापू भेगडे यांना निवडून आणणे हेच आमचे लक्ष असल्याचे बाळा भेगडे म्हणाले.

बापू भेगडेंना दिलं होतं महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचं उपाध्यक्षपद

विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजलं आहे. त्यामुळे आता मावळ विधानसभा मतदारसंघात देखील उमेदवारीवरून रस्सीखेच पहायला मिळत आहे. सध्या मावळ विधानसभा मतदारसंघात महायुतीमध्येच रस्सीखेच असल्याचं दिसून येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष बापूसाहेब भेगडे यांची पक्षाकडून राज्य शासनाच्या महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती. मात्र या पदाची मागणी केली नाही त्यामुळे हे पद नको. तर मावळ विधानसभा मतदारसंघातुन उमेदवारी मागितली असून पक्षाने माझी उमेदवारी जाहीर करावी अशी भूमिका बापू भेगडे यांनी घेतली होती. पत्रकार परिषद घेत बापू भेगडे यांनी ही भूमिका मांडली होती. मात्र, अजित पवार गटाकडून सुनिल शेळके यांनाचं पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे.

# लॉरेन्स बिष्णोई टोळीशी संबंधित चौघे जण ताब्यात; मुंबई पोलिसांकडून कर्वेनगर भागात कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणाचा कट पुण्यातील कर्वेनगर भागात रचल्याचे तपासात उघडकीस आले. या प्रकरणात लॉरेन्स बिष्णोई टोळीशी संबंधित प्रवीण लोणकरला अटक करण्यात आली. त्याचा भाऊ शुभम पसार झाला असून, त्याच्या संपर्कात असलेल्या चौघांना मुंबई पोलिसांनी बुधवारी चौकशीसाठी ताब्यात घेतले.

रुपेश मोहोळ, करण साळवे, शिवम मोहोळ, रियान खान अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आहे. सिद्दीकी हत्या प्रकरणात पुण्यातून प्रवीण लोणकर, धर्मराज कश्यप, गुरुनील सिंग यांना अटक करण्यात आली.



प्रवीण लोणकर कर्वेनगर भागात डेअरी चालवायचा. प्रवीण आणि त्याचा भाऊ शुभम समाज माध्यमांतून बिष्णोई टोळीतील सराइतांच्या संपर्कात होते. सिद्दीकी हत्या प्रकरणातील आरोपींच्या संपर्कातही प्रवीण आणि शुभम होते.

बिष्णोई टोळीला पिस्तूल पुरविल्याप्रकरणी शुभमला अकोला पोलिसांनी अटक केली होती. कर्वेनगर भागातून बुधवारी ताब्यात घेण्यात आलेले चौघे जण शुमभच्या संपर्कात होते. बिष्णोई टोळीने शहरातील एका सराफी पेढीच्या मालकाला जीवे मारण्याची धमकी देऊन दहा कोटी रुपयांची खंडणी मागितली होती, पुणे पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

# संभाजी ब्रिगेडचा ठाकरेंना ‘दे धक्का’, युती तोडली; विधानसभेला ५० मतदारसंघात उमेदवार देणार

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभा निवडणुकीबाबत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने संभाजी ब्रिगेडला विश्वासात घेतले नाही, त्यामुळे ही युती आता तुटली असून राज्यात संभाजी ब्रिगेड स्वबळावर लढणार आहे. तसेच राज्यात ५० पेक्षा अधिक उमेदवार देणार असल्याची माहिती संभाजी ब्रिगेडचे प्रदेश प्रवक्ते डॉ.शिवानंद भानुसे यांनी प्रसिद्धी दिली आहे. संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष मनोज आखरे, महासचिव सौरभ खेडेकर, गंगाधर बनबरे, यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकी संभाजी ब्रिगेड राज्यातील ५० हून अधिक मतदारसंघात उमेदवार देत ही लढत अधिक चुरशीची करण्याच्या तयारीत आहे.



सन्मानपूर्वक स्थान आणि आश्वासनानुसार जागा न दिल्याचा आरोप

दोन वर्षापूर्वी शिवसेनेबरोबर संभाजी ब्रिगेडची युती झाली होती. लोकसभा निवडणुकीत एकही जागा न घेता संभाजी ब्रिगेडने शिवसेना (उबाठा) महाविकास आघाडीचा प्रचार केला. दरम्यान, महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले. त्यावेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी विधानसभेला संभाजी ब्रिगेडला त्यांच्या कोट्यातून किमान चार ते पाच जागा देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु विधानसभेच्या जागा वाटपात आम्हाला सन्मानपूर्वक स्थान आणि आश्वासनानुसार जागा न दिल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडचे प्रदेश प्रवक्ते डॉ. शिवानंद भानुसे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे.

विधानसभेला ५० मतदारसंघात उमेदवार देणार- डॉ.शिवानंद भानुसे

शिवसेना (उबाठा) बरोबरची युती तोडून महाविकास आघाडीतून आम्ही बाहेर पडत आहोत. जात, धर्म, फॅसिस्ट शक्तींना संभाजी ब्रिगेडचा नेहमीच विरोध राहिला असून तो कायम राहील. संविधान आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी आम्ही लोकांचे प्रश्न, महामानवांचे विचार घेऊन निवडणुकीला सामोरे जात आहोत. सुमारे ५० जागावर आमचे उमेदवार अर्ज भरणार आहेत. महायुतीची सनातन विषमता आणि आघाडीचे नकली पुरोगामीत्व या विरोधात समाजमत तयार करण्याची गरज असल्याचेही डॉ.शिवानंद भानुसे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

संभाजी ब्रिगेडच्या एका शिष्टमंडळाने काही दिवसांपुर्वी मराठा आरक्षणासाठी आंदोलनाचा लढा उभारणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली होती. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून संभाजी ब्रिगेड मनोज जरांगें यांच्यबरोबर जाणार आहेत. मराठा क्रांती मोर्चाकडून आता नेमकं कोणाला उमेदवार म्हणून जाहीर केलं जाईल हे पाहणंही महत्त्वाचं असणार आहे.

# पुणेकरांचे प्रश्न सोडवण्यास प्राधान्य - आमदार सिद्धार्थ शिरोळे यांची माहिती

**पुणे। प्रतिनिधी**

आमदाराकीच्या आपल्या पहिल्या टर्ममध्ये पुणेकरांचे नेतृत्त्व करत असताना शासनदरबारी अनेक प्रश्न मांडले आणि काही प्रश्न सोडवलेही. काही प्रश्न सोडवणे हे शासनाच्याच हाती असतात.त्यामुळे त्यांच्याकडे पाठपुरावा केल्याने अनेक प्रश्नांची मांडणी, मागण्या विधानसभेत लक्षवेधीच्या माध्यमातून केल्याचे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी सांगितले.

शिरोळे यांना भाजप-महायुतीने शिवाजीनगर विधानसभा मतदार संघातून पुन्हा एकदा संधी दिली आहे. गेल्या पाच वर्षांत या भागाचे नेतृत्त्व करताना राज्य सरकारकडे अनेक गोष्टींबाबत पाठपुरावा करावा लागतो.त्यामुळे केवळ शिवाजीनगर मतदारसंघच नव्हे, तर सर्वसामान्य व्यक्तींना भेडसावणाऱ्या प्रश्नांकडेही शिरोळे यांनी सरकारचे लक्ष वेधले.

नागरिकांना फिरण्यासाठी आणि विशेषत: मुलांना खेळण्यासाठी शहरातील सरकारी संस्थांची मैदाने उपलब्ध करून द्यावीत. येथील कृषी महाविद्यालय, पोलीस ग्राउंड, औंध आयटीआय, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ येथे ही मैदाने



आहेत, असे शिरोळे यांनी सांगितले.

मराठा समाजातील तरुणांना शैक्षणिक सवलतींत भरीव वाढ करावी. आरक्षणाची कायदेशीर लढाई तडीस न्यावी, पुरावे मिळाले असतील त्यांना त्वरीत कुणबी दाखले द्यावेत, जेणेकरून त्यांना शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये मदत होईल, अशी मागणीही शिरोळे यांनी विधानसभेत केली होती.ऑनलाइन फसवणुकीच्या प्रकारांना गांभार्याने घेऊन, सायबर सेलतर्फे या सगळ्या प्रकरणांची चौकशी झाली पाहिजे. यामध्ये विशेषत्वाने वीजबिलाच्या खोट्या मेसेजेसचा प्रश्न शिरोळे यांनी विधानसभेत उपस्थित केला.

वाळू माफियांवर पोलिसांनी सक्त पाऊल उचलून त्यांच्यावर शासनाची दहशत बसेल अशी कारवाई करण्याची मागणीही शिरोळे यांनी केली. पुणे शहर हे वेगाने वाढत आहे. शहरभर दुप्पट वेगाने बांधकामे सुरू आहेत.

अनेक ठिकाणी रात्री-बेरात्रीच्या वेळेस बांधकामे चालतात. बांधकामासाठीची वाहने, अवाढव्य यंत्रसामग्री यांच्या आवाजाचा त्रास आजूबाजूच्या ज्येष्ठ नागरिकांना आणि लहान मुलांना होत असतो. याबाबतच्या अनेक तक्रारी माझ्याकडे आलेल्या आहेत.

त्यासंदर्भात माहिती घेतल्यानंतर महापालिकेकडून बांधकाम कोणत्या वेळेत सुरू ठेवावे तसेच हे काम करताना नागरिकांना काही त्रास होणार नाही, यासाठी काय काळजी घ्यावी, अशी नियमावली तयार केलेली नाही असे निदर्शनास आले. तरी पुणे महापालिकेस बांधकाम नियमावली करण्याचे आदेश देण्यात यावेत, अशी मागणीही शिरोळे यांनी केली होती.

मी केलेल्या कामाची फलश्रुती होऊन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उत्कृष्ट वक्ता म्हणून पुरस्कार मिळाला. याचा आनंद आहे. आपण मांडलेल्या नागरी प्रश्नांची ही पोहोचपावती आहे. या पुरस्कारामुळे आणखी काम करण्याची ऊर्जा मिळते. - आमदार सिद्धार्थ शिरोळे, उमेदवार, भाजप, शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघ

मुळशी धरणाचे पाणी पुण्याला मिळावे

शहरातील पाण्याचा प्रश्न हा दिवसेंदिवस बिकट होत चालला आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे पाण्याची कमतरता निर्माण होत आहे.

हा प्रश्न सोडवण्यासाठी मुळशी धरणातून शहराला पाणी मिळेल का, असा सवाल आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी सरकारपुढे उपस्थित केला. तसेच हे पाणी मंजूर व्हावे, त्यासाठी प्रयत्नही केले आहेत.

# ‘एसपी’ज् चा आगळावेगळा बिर्याणी फेस्टिव्हल सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

एसपी'ज बिर्याणी अवघ्या बिर्याणीप्रेमींच्या जिभेवरील आणि मनातील नाव! यंदाचे बिर्याणी फेस्टिव्हलचे हे बारावे वर्ष आहे. हा बिर्याणी फेस्टिव्हल आता सुरू झाला आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. संदीप सिंग गिल (आयपीएस), मा. जालिंदर सुपेकर (डीआय्जी-महाराष्ट्र पोलीस, कारागृह विभाग), डॉ. संदीप साठे (जॉइंट कमिशनर ऑफ इन्कम टॅक्स, पुणे) आणि मा. जयंत महाबोले उपस्थित होते.

जवळपास तीस वर्षे खवैयांना एक से बढकर एक बिर्याणीचा आस्वाद देताना एसपीज्ने दरवेळी काहीतरी नवीन देण्याचा प्रयत्न केला. याच प्रयत्नातून बिर्याणी फेस्टिव्हलची भन्नाट कल्पना सुचली. एसपी'ज बिर्याणीचे सर्वेसर्वा जवाहर चोरगे आणि हॉटेल मॅनेजमेंटचे शिक्षण घेतलेले त्यांचे पुत्र हर्षवर्धन यांच्या कल्पनेतून बिर्याणी फेस्टिव्हलची कल्पना सत्यात उतरवली.

अशाप्रकारचा संपूर्णपणे बिर्याणींचा हा आगळावेगळा फेस्टिव्हल बहुधा आणखी कुठे पहावयास मिळणे कठीणच! यामुळेच तर अगदी सर्वसामान्यांपासून राजकारण, क्रीडा, कला, समाजकार्य विविध क्षेत्रातील मान्यवर इथे बिर्याणींचा आस्वाद घेण्यास येतात. मग ते संगीत क्षेत्रातले दिग्गज संगीतकार अजय अतुल असो वा बॉलिवुडचा मि. परफेक्शनिस्ट आमीर खान सर्वचजण इथल्या बिर्याणींचे डाय हार्ट फॅन आहेत.

अगदी पर्शियनपासून काश्मिरीपर्यंत आणि इराणीपासून जाफराणीपर्यंत मटण व चिकन बिर्याणी इतकी बिर्याणींची वाईड रेंज इथे तुमच्या जिभेचे स्वादलाड पुरवतील. यासोबतच रसरशीत राजस्थानी लाल मटण, बढियाँ कराची मटण मसाला, फक्कड जत्रा मटण हंडी, चटकदार मटण खर्डा सगळाच बेत एकदम झक्कास! या नॉनव्हेजसोबतच व्हेज खवैयांचीही इथं उत्तम खातिरदारी आहे. व्हेज पुलाव, लाजवाब शाही व्हेज बिर्याणी, पनीर मसाला हाही बेत तितकाच स्वादपूर्ति करणारा आहे.

फक्त भारतातीलच नव्हे तर जगभरच्या बिर्याणींचा आस्वाद इथं एकाच ठिकाणी घेता येतो. दरवर्षी या फेस्टिव्हलला उदंड प्रतिसाद मिळतो. प्रत्येकवेळी काहीतरी नवीन देण्याच्या एसपीज्च्या परंपरेनुसार यावेळी त्यांनी मलमल मटण दम बिर्याणी, मलमल मटण पुलाव आणि लजीज खिमा या अत्यंत चवीष्ट डिश खवैयांसाठी तयार केल्या आहेत. चोखंदळ खवैयांचा त्यालाही भरघोस प्रतिसाद मिळत आहे.

cmyk